म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वां. वा.
दा. क्र. ९८७२

BVEK-0401979

BVBK-0401979

## -एक

रविवार. सर्वांच्या विश्रांतीचा दिवस. राहिलेली कामे करण्याचा दिवस. हे आमचं गणित. आज कित्येक दिवस हे असेच चालू आहे. याचा अर्थ असा नव्हे की राहिलेली सर्व कामे निश्चितपणे होतातच. कारण आल्या-गेल्यांनासुद्धा रविवारच बरा वाटतो. अशी कोणी मित्रमंडळी आली की सर्व बेत संपलाच. ठरलेले काहीही बेत होत नाहीत. पुढच्या रविवारची वाट बघत हा रविवार केव्हा संपतो ते कळतही नाही. अर्थात सर्वच रविवार असे जातात असे मात्र नाही. काही दिवस तर चांगलेच लक्षात राहतात. एकदा असंच झालं

जून महिन्याच्या पहिल्या पावसानं उन्हाळ्याला जरा मागे सारले. मुलांच्या शाळा चालू व्हावयाच्या होत्या. त्यांना नवीन पुस्तकं आणि नवीन वर्ग यांनी आपलंसं करून टाकलं होतं. इतके दिवस नजरेआड झालेली दप्तर, लिखाणाचं साहित्य आणि नवीन आणलेली वह्या-पुस्तकांची गणती चालू होती. मुक्या मनानं मी हे पाहात होतो. मलाही पूर्वीच्या आठवणी आल्या. आपणही

असेच करीत होतो. या आठवणीत मग्न असताना दारावरची घंटा वाजली आणि माझी तंद्री भंग पावली. मी दार उघडले. माधव–बारा-चौदा वर्षांचा मुलगा समोर होता.

ये. मी त्याला आत बोलावले.

तो आला. दरवाज्याच्या बाजूला चपला ठेवून तो पुढे आला. मला नमस्कार करून तो म्हणाला, काका मला आईनं मुद्दाम पाठवलं. बाबा गावाला गेलेत. म्हणून मी एकटाच आलो.

ठीक. बस त्या खुर्चीवर.

खुर्चीवर !

हो. बस ना. खुर्ची ही बसण्यासाठीच असते. हं बस.

खुर्चीवर तो बसला, पण जरा अंग चोरूनच.

नीट बस. काही हरकत नाही. तो जरा सावरून बसला तेव्हा मी त्याला म्हटले– आई वगैरे कशी काय आहे ?

सर्व ठीक आहेत.

आईनं काय निरोप दिलाय ?

निरोप वगैरे नाही.

मग– आत्ताच तर तू म्हणालास ना आईनं पाठविलं म्हणून

हो, आईनंच पाठवलं. उद्या सोमवार, उद्यापासून आमची शाळा सुरू आहे. तेव्हा आई म्हणाली, काकांकडे जा. त्यांना नमस्कार कर. त्यांचा आशीर्वाद घे आणि त्यांना सांग, तुम्हाला वेळ झाला म्हणजे आमच्याकडे या.

कितवीत गेलास तू ?

आठवीत.

मग आता तुला बराच अभ्यास करावा लागेल. वय वाढलं, इयत्ता वाढली आणि आता अभ्यासही वाढला.

होय. बाबा म्हणत होते आठवी इयत्ता म्हणजे एस. एस. सी.ची खरी सुरुवात. या इयत्तेत खऱ्या विद्यार्थीदशेला सुरुवात होते.

बरोबर आहे त्यांचं म्हणणं.

पण काका आता मी आठवीपर्यंत शिकत आलो. त्यावेळी विद्यार्थी होतोच की. मग या इयत्तेपासून विद्यार्थीदशेची खरी सुरुवात होते असं बाबा का म्हणत होते ?

या इयत्तेपासून तुम्हाला स्वत:ला बऱ्याच गोष्टी आपण होवून कराव्या लागतात. पूर्वी तुमचे शिक्षक तुमच्याकडून अभ्यास करवून घेत असत. आता शिक्षक शिकवतील आणि त्याप्रमाणे तुम्हाला स्वत:लाच अभ्यास करावा लागेल. प्रत्येक विषयाची टिपणे स्वत: काढावी लागतील आणि त्यांचा वारंवार मागोवा घेत अभ्यास करावा लागेल.

स्वत:चा अभ्यास स्वत: करणं हे तर प्रत्येक विद्यार्थ्याला करावंच लागतं. मग बाबा म्हणतात त्याप्रमाणे खरी विद्यार्थीदशा म्हणजे काय ?

विद्यार्थीदशा म्हणजे स्वावलंबनाने ज्ञान प्राप्त करणे.

स्वावलंबन ? मला नाही नीट कळले.

स्वावलंबन म्हणजे प्रत्येक गोष्टीत स्वत: होऊन पुढं व्हायचं आणि कार्य करायचं. आता हेच पहा. तू म्हणालास मी विद्यार्थी आहे. विद्या मिळविणं हे ज्याचं आद्य कर्तव्य आहे त्याला विद्यार्थी म्हणतात. आता तू सांग. तू लिहितोस, तुझं अक्षर कसं मोत्या-सारखं पाहिजे. आहे का ?

नाही. मला बाबा आणि आई नेहमी म्हणतात, माधव अभ्यासा-बरोबर तू तुझं अक्षर सुधार.

अगदी बरोबर आहे. अक्षर चांगलं असणं हे विद्यार्थ्यांचे पहिले

लक्षण. ते जर चांगले नसले तर परीक्षेत तू लिहिलेले उत्तर परीक्षकांना वाचता येणार नाही आणि त्यामुळे गुण कमी मिळतील. पण तेच अक्षर जर चांगलं असलं तर परीक्षकांना उत्तर वाचायला त्रास होणार नाही. ते तुझ्या लिखाणावर खूष होतील आणि थोडे जास्तच गुण देतील.

पण काका अक्षर सुधारायला खरे मार्गदर्शन पाहिजे.

मार्गदर्शन तुमचे गुरुजी करतातच. परंतु त्याप्रमाणे रोज अक्षर घटवण्याचे कार्य तुलाच केले पाहिजे. ही मेहनत खरे तर यापूर्वीच घ्यायला पाहिजे होती, पण अजूनही वेळ गेली नाही. विद्यार्जनाला कुठलीही वेळ वाईट नसते. तू वर्षाच्या प्रारंभापासून अक्षर चांगलं करण्याकडे लक्ष दे. त्यासाठी तुला एक सोपा उपाय सांगतो. प्रथम पुस्तकाप्रमाणे अक्षर काढण्याचा प्रयत्न कर आणि मग रोज तू दैनंदिनी लिहावयाला सुरुवात कर.

दैनंदिनी लिहावयाची, पण ती केव्हा ? आणि कशी ?

दैनंदिनी रोज रात्री झोपण्यापूर्वी लिहावयाची. ही लिहित असताना रोज आपलं अक्षर कसं सुधारत जाईल याची दक्षता घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे त्यात सर्व खरे लिहावयाचे. त्यात आज बाबा रागावले, एवढंच लिहावयाचं नाही, तर का रागावले, आपण रागवण्यासारखे काय केले ते पण लिहिले पाहिजे. एखादे चांगले पुस्तक वाचलेस तर त्या पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, त्यातील विषय आणि त्यातून तुला काय आवडले ते लिहावयाचे. एखादा मित्र भेटला किंवा आपल्यापेक्षा कोणी मोठे भेटले, काही बोलणे झाले तर त्याचा सारांश देखील त्या दैनंदिनीत आला पाहिजे.

काका तुम्ही किती चांगल्या गोष्टी सांगितल्यात. केवळ एका

दैनंदिनीनं माझा किती फायदा होईल. एक अक्षर सुधारेल आणि निरनिराळ्या प्रसंगाची नोंद केलेली असल्याने पुष्कळच मार्गदर्शन लाभेल त्यातून.

मोठे लोक अशी दैनंदिनी लिहित असत. त्यांच्या त्या दैनंदिनी म्हणजे एक मोठा ग्रंथच आहे. आपण ज्यावेळी मोठे होवू त्यावेळी जुने प्रसंग वाचताना मोठी मौज येते. आपण होतो कसे आणि झालो कसे हे समजण्यासाठी तयार झालेला हा एक आरसाच आहे.

मी आणखी काय करू?

आणखी करण्यासारखं पुष्कळ आहे. अस म्हटलं आहे की विद्यार्थ्यांची वृत्ती मधमाशीसारखी असावी.

म्हणजे कशी?

मधमाशी काय करते तुला माहीत आहे. फुलझाडं असतात. त्यांवर फुलं आली म्हणजे मधमाशी त्या फुलाशी जाते. हळूच त्यातला मध घेते आणि आपल्या पोवळ्याकडे येते. तेथे आणलेला मध साठविते. पुन्हा बाहेर जाते, पुन्हा मध घेवून येते. असा ती पुष्कळ मध गोळा करते. त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याने बारीक लक्ष ठेवावे. अगदी कागदाचा कपटासुद्धा नजरेआड करू नये. त्यातूनही काही बोध मिळेल. कोणतीही गोष्ट हलकी समजण्याचे कारण नाही. ज्या ठिकाणाहून जे मिळेल ते घ्यावे. साठवून ठेवावे आणि योग्य वेळी त्याचा उपयोग करावा. माणसेच काय देव-सुद्धा ज्ञानासाठी विद्यार्थी बनतात. ज्या ठिकाणाहून ज्ञान मिळेल तेथून ते नम्रपणाने घेतात. स्वतः त्याचा उपयोग करतात आणि लोकांनाही त्याप्रमाणे मार्गदर्शन करतात. तुला अवधूतांची कथा माहीत आहे का?

नाही. त्यांनी काय केलं ?

अरे, बरेच काही केले. समाजाला चांगलं सांगता यावे म्हणून त्यांनी एकूण २४ जणांकडून ज्ञान घेतले.

म्हणजे त्यानी चोवीस गुरूंकडून शिक्षण घेतलं असंच ना.

होय, त्यांनी चोवीस गुरू केले. ज्याच्याजवळ जो गुण होता तो तो अवधूतांनी घेतला आणि त्याला आपला गुरू म्हणून मान दिला.

त्यांचे असे गुरू तरी कोण होते ?

तू ऐकलेस तर तुला नवल वाटेल. पृथ्वी, वायू, आकाश, जल, अग्नि, चंद्र, सूर्य, कपोत, अजगर, समुद्र, पतंग, मधमाशी, हत्ती, मध हरण करणारा, हरिण, मासा, वेश्या, टिटवी, बालक, कुमारी, बाण तयार करणारा लोहार, साप, कांतीण, कुंभारमाशी. हे सर्व त्यांचे गुरू होते.

या प्रत्येकाने अवधूतांना काहीतरी शिकविले म्हणून ते त्यांचे गुरू झाले. पण काका तसं पाहिलं तर हे सर्व गुरू अगदीच लहानसे आहेत आणि असे असूनही त्यांनी अवधूतांना काय शिकवलं ?

तुला ऐकायचं आहे ?

हो. हो. मला ते खूपच आवडेल.

मग ऐक तर.

१) पृथ्वीने– क्षमा कशी करावी ते शिकविले.

२) वायू– वाणीची स्थिती चांगली राहावी आणि सर्व पदार्थ आपलेसे करावेत.

३) आकाश– परमेश्वर सर्वत्र भरला आहे.

४) उदक– सर्वांना जगण्यासाठी मदत करते. सर्वांना स्वच्छ आणि पवित्र करते. आपले मनही त्याप्रमाणे असावे.

५) अग्नि– तेजोवान, आणि उपकारक आहे. अग्नि नसेल तर आपणास जगता येणार नाही.

६) सूर्य– वाईट गोष्टींचा नाश करून प्रत्येकाचे जीवन उजळून काढतो. परंतु सूर्याला त्याचा गर्व मात्र नाही.

७) चंद्र– प्रकाशमान असला तरी शीतल आहे. तो शुक्ल पक्षात वाढत जातो आणि वद्य पक्षात कमी होत अमावस्येला नाहीसा होतो. त्याप्रमाणे प्रत्येक वस्तूच्या आयुष्यात चढउतार आहेत. त्यामुळे मनुष्याने घाबरून जाऊ नये:

८) कपोतपक्षी– अतिशय प्रेम आणि हव्यास यामुळे सर्वस्वाचा नाश होतो.

९) अजगर– सुख आणि दुःख यांचा परिणाम न होऊ देता मिळेल त्यात समाधान मानणे

१०) समुद्र– समुद्र रमणीय वाटतो. तो खुप खोल आहे. व्यापक आहे. त्याला अनेक नद्या मिळतात पण त्याचे पाणी कधी वाढत नाही आणि कधी कमीही होत नाही. त्याप्रमाणे मनुष्याने खूप विद्या आत्मसात करावी पण त्याचा देखावा करू नये. स्तुतीने फुगून जाऊ नये आणि निंदेने हतबुद्ध न होता आपल्या दोषाची दुरुस्ती करण्यास मिळालेली ही संधी आहे असे समजावे.

११) पतंग– पतंगाला प्रदीप्त अग्नीची ओढ असते. तो आपले शरीर अग्नीत लोटून देतो पण आपले प्रेम नाकारीत नाही. आपल्या ध्येयासाठी मनुष्याने आपले शरीर तृणवत मानावे आणि ध्येय गाठताना शरीराच्या नाशाचासुद्धा विचार करू नये.

१२) मधमाशी– फुलांना जराही त्रास न देता ती मध गोळा करते. आपणास विद्या प्राप्त करावयाची असेल तेव्हा ज्याच्याकडून विद्या शिकायची त्याला जराही त्रास न देता विद्या प्राप्त

करावी.

१३) हत्ती– कोणाच्याही वाईट संगतीपासून दूर राहावे.

१४) मध हरण करणारा– मधमाशी मध साठवते. तो मध मनुष्य काढून आणून साठवतो आणि त्याचा उपभोग मात्र तो स्वतः न घेता दुसऱ्यास घ्यावयास लावतो.

१५) हरिण– निरुपद्रवी व्हावे हे हरणापासून शिकावे.

१६) मासा– येईल ते माझेच आहे म्हणून साठविणाऱ्यांचा अखेर नाश होतो. स्वजनांना गिळून मासा मोठा होतो परंतु एक दिवस कोळ्याच्या जाळ्यात तो सापडतो आणि त्याचाही नाश ओढवतो.

१७) वेश्या– सतत आशा करीत राहून ती अपूर्ण राहिली तरी दुःख न मानता पुन्हा संयमाने आशा करीत राहणे हे वेश्येने शिकविले.

१८) टिटवी– प्रियकर वस्तूंच्या संग्रहाने दुःखालाच आमंत्रण दिले जाते.

१९) बालक– मान-पान, बरे-वाईट यांचा विचारसुद्धा मनाला शिवत नाही. त्यामुळे बालक नेहमी आनंदात राहते.

२०) कुमारी– दोन किंवा अधिकांचा सहवास वादाला आणि दुःखालाही कारणीभूत होतो.

२१) बाण तयार करणारा– चित्ताची एकाग्रता झाल्याशिवाय बाणाचे टोक सूक्ष्म करता येत नाही. मनाची एकाग्रता कशी करावी हे या बाणकाराने शिकविले.

२२) सर्प– सर्प एकटाच फिरतो पण नेहमी सावध असतो. त्याच्या बाह्य रूपावरून त्याच्या अंतराची कल्पना येत नाही. त्याला नेहमी एकांत आवडतो.

२३) कोळी– आपल्याच पराक्रमाने तो आपले घर करतो आणि त्यातच तो सुखाने राहतो. घर बांधण्याचे साधन त्याच्या जवळच असते.

२४) कुंभारीण माशी– आपल्या स्वत:भोवती असलेला कोष फोडून ती बाहेर पडते. पुन्हा त्या कोशाबद्दल तिला प्रेम वगैरे वाटत नाही. एकदा मुक्त झाला तो बंधनाची अपेक्षा करीत नाही.

ज्याच्याकडून आँपण काही घेतलं आणि त्याचा उपयोग आपल्या दैनंदिन जीवनात आपण करून घेत असू तर आपण घेतलेलं आणि ज्यांनी ते दिलं ते दोघेही मोठे असल्याने त्यांना गुरू असेच संबोधतात. पण विद्यार्थ्यांनी मात्र हे घेताना मोठी दक्षता घेतली पाहिजे. तरच त्याला ज्ञानवान् होता येईल.

गुरूंनी शिकविलेलं आपण आत्मसात केलं की, आपण विद्वान होऊच.

तुझं म्हणणं खरं आहे. पण त्यासाठी खरं सांगायचं तर गुरुजींनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट महत्त्वाची आहे. आपणास ती कळली नाही तर गुरुजींना आपण ती पुन्हा सांगण्यासाठी विनंती केली पाहिजे. त्यासाठी नम्र व्हायला पाहिजे. तू तुझ्या गुरुजींना एखादी शंका विचारलीस तर गुरुजींना असं वाटलं पाहिजे की, त्याला सर्व काही सांगितलं पाहिजे. गुरुजींच्या पोटात शिरून आपण आपल्या शंकेचं निरसन करून घेतलं पाहिजे. म्हणून मी म्हटलं. विद्यार्थ्यानं नेहमी नम्र बनलं पाहिजे. गुरुजींना नम्र मुलं आवडतात. तुला एक सुभाषित माहीत आहे का ?

विद्या विनयेन शोभते ।

माणसाजवळ विद्वत्ता आली की, त्याला आपोआप गर्व चढतो.

असा मनुष्य कितीही विद्वान असला तरी लोकांना आवडत नाही. पण विद्वत्ता असून अंगी नम्रपणा असेल असा मनुष्य लोकांना नेहमी आवडतो. लोक त्याला मान देतात. तुला विवेकानंदांची गोष्ट माहीत आहे का ?

कोणती गोष्ट. त्यांच्या नम्रपणाची ?

नाही. सांगा काका.

तशी गोष्ट मोठी नव्हे. लहानशीच आहे. पण त्या गोष्टीवरून बरंच काही शिकण्याजोगं आहे. स्वामी विवेकानंद फार मोठे विद्वान होते जगातल्या फार मोठमोठ्या पंडितांनी त्यांच्या विद्येचा गौरव केला होता. खरं तर त्यांना त्याचा केवढा अभिमान वाटायला पाहिजे होता. पण त्या अभिमानाचा किंवा गर्वाचा अंश सुद्धा त्यांच्याजवळ नव्हता. एकदा स्वामी आणि त्यांचे बरेचसे शिष्य सागराच्या काठी बसून काही चर्चा करीत होते. स्वामींचे बोलणे ऐकून त्यांचा एक शिष्य म्हणाला, 'स्वामी आपले ज्ञान खरोखरीच अगाध आहे. अन्य शिष्यांनी देखील त्याला दुजोरा दिला. स्वामींनी ते ऐकले. आपल्या हातातल्या काठीचा सागराच्या पाण्याला स्पर्श केला आणि ती काठी उंचावून ते शिष्यांना म्हणाले, 'या काठीच्या कितीशा भागाला पाणी लागलं आहे. तेव्हा शिष्य म्हणाले, 'किंचितसं पाणी लागलं आहे.'

होय ना– स्वामी म्हणाले, 'हा सागर केवढा आहे. त्यातलं पाणी किती आहे ?'

ते तर मोजताच येणार नाही. म्हणून तर सागराला अथांग म्हणतात– शिष्य.

या सागराच्या पाण्यापैकी जेवढं पाणी या काठीला लागलं आहे तेवढंच ज्ञान माझ्याजवळ आहे. बाकीचं पाणी जसं शिल्लक



आहे त्याप्रमाणे या विश्वाच्या पसाऱ्यात ज्ञान अथांग पसरले आहे. त्यांपैकी गुरुदेव रामकृष्णांच्या परमकृपेनं मला हे एवढंच मिळालं आहे मग मी गर्व का करावा ?

या गोष्टीतून कितीतरी घेण्यासारखे आहे. विवेकानंद नम्र होते. म्हणून त्यांना ज्ञान प्राप्त झालं आणि ज्ञान प्राप्त झाल्यामुळं त्यांचा सर्वत्र गौरव झाला. विद्याधन हे फार मोठं धन आहे. तू मला सांग आपल्याकडे काय किंवा परदेशात काय किती श्रीमंत लोक झाले. श्रीमंत म्हणून कोणाचा गौरव झालाय. कधी ऐकलास तू ?

नाही किती श्रीमंत लोक झाले तेसुद्धा सांगता येणार नाही. कारण त्यांचे नाव त्यांच्या मागं राहातच नाही.

अगदी बरोबर. पण ज्ञानधनी लोकांची नावे सर्वांच्या मुखावर अजूनही आहेत. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, विवेकानंद, रामतीर्थ, लोकमान्य टिळक अशी कितीतरी नावे अजून ताजी वाटतात. यांच्याजवळ पैसा नव्हता पण विद्या होती. त्यांचा गौरव म्हणजे त्यांच्या विद्येचा गौरव.

काका, मलाही वाटतं आपण खूप शिकावं आणि खूप मोठं व्हावं. त्यासाठी वाटेल तेवढी मेहनत घेण्याची माझी तयारी आहे. पण माझी अडचण आहे ती, अभ्यास कसा करावा, हेच कळत नाही. त्यामुळे मला नेहमी असं वाटतं की, आपण मनात आणलं त्याप्रमाणे घडेल की नाही कुणास ठाऊक. मी काय करावं ते तुम्हीच सांगा.

तुला काय करायचं ते सांगण्यापेक्षा मी कसा अभ्यास केला आणि अजूनही करतो ते तुला सांगतो. अर्थात आमचा काळ आता जुना झाला तरीपण त्यातलं सर्वच काही टाकाऊ ठरणार

नाही.

सांगा काका. तुम्ही सांगाल त्याप्रमाणे करण्याचा मी अगदी कसोशीने प्रयत्न करीन.

सांगतो, ऐक. आमच्या अभ्यासाची सुरुवात अगदी शाळेच्या पहिल्या दिवसापासून होत असे. प्रत्येक दिवस हा अभ्यासाचा आहे याची आम्हाला सतात जाणीव असे. वर्गात आमचे शिक्षक आम्हाला शिकवीत असत. आम्ही घरी आलो की, तो शिकविलेला धडा पुन्हा एकदा वाचीत असू. धडा वाचताना प्रत्येक परिच्छेद काळजीपूर्वक वाचायचा आणि त्या परिच्छेदातील सारांश केवळ दोन तीन वाक्यांमध्ये लिहून ठेवायचा. त्यामुळे संपूर्ण धडा पंधरा-वीस वाक्यांत लिहून होत असे. परीक्षेच्या वेळी एवढे वाचले म्हणजे झाले. असे प्रत्येक विषयाच्या बाबतीत आम्ही करीत असू.

आणि गणितासारख्या किंवा भूमितीसारख्या विषयात काय करीत होतात.

चांगला प्रश्न विचारलास. गणिताची रीत, बीजगणितातील सूत्रे आणि भूमितीमधील प्रमेय-विस्तार फक्त चांगला लक्षात ठेवण्यासाठी ज्या दिवशी शिक्षक गणित शिकवतील त्याच दिवशी त्याच रीतीची गणितं घरी करायची. अर्थात या अभ्यासामध्ये काही गोष्टी पाठच कराव्या लागतात आणि त्या केल्याच पाहिजेत असा आमच्या शिक्षकांचा आग्रह असे.

पाठांतर करायचे म्हणजे वेळ घालविण्यासारखे वाटते.

नाही. तुला पाठांतराचे फायदे सांगतो. आमच्या वेळी आम्ही सर्व प्रकारचे पाढे पाठ करीत असू. इतकेच नव्हे तर रोज संध्याकाळी ते एकदा म्हणत असू. त्यामुळे गणिताची उत्तरे अगदी अचूक आणि त्वरेने तयार करता येत. शिवाय पाठांतराने

स्मरणशक्ती वाढते ती निराळीच. पण अलीकडे पाठांतर कमी व्हायला लागले आहे.

पण काका, गणकयंत्रे वगैरे आहेत. त्यांचा उपयोग केला तर आपणास उत्तर त्वरित मिळेल अशा वेळी पाठांतराचे महत्त्व ते काय राहिले.

छान ! तुझी शंका अगदी रास्त आहे. व्यवहारात गणकयंत्राचा उपयोग करण्यास काहीच हरकत नाही. परंतु आपण त्यामुळे परावलंबी बनतो. स्वावलंबी असणं हे तर विद्यार्थ्याचे पहिले लक्षण आहे. यापूर्वीच्या पाठांतराचा उपयोग कसा होतो त्याचा तुला एक अनुभव सांगतो. माझी मुलगी आफ्रिकेत होती. तिने भाजी खरेदी केली. तेवढ्यात विजेनं धोका दिला. वीज गेली त्यामुळे गणकयंत्र बंद पडलं. पैसे द्यायला गेल्यावर त्या दुकानदाराने सांगितले, तुम्ही पाच नवलकोल घेतलेत. एक सहा तरीं घ्या नाहीतर बारा तरी घ्या. माझ्या मुलीने पाच नगाचे पैसे दिले पण तो दुकानदार घेईना. थोडा वेळ थांबल्यावर वीज आली. दुकानदाराने बील केले आणि मुलीने दिलेले पैसे हाती घेतले. ते अगदी बरोबर असल्याचे पाहून त्याने विचारले, तुमच्याजवळ गणकयंत्र वगैरे काही आहे का तेव्हा ती म्हणाली नाही. तेव्हा दुकानदाराने पुन्हा विचारले, मग तुम्ही अगदी बरोबर पैसे कसे दिलेत. तेव्हा तिने आम्ही पाढे वगैरे पाठांतर करीत असल्याचे त्याला सांगितले. त्यावेळी तो दुकानदार म्हणाला, तुमच्या पाठांतराने तुम्हाला स्वावलंबी बनविले आहे.

उदाहरण लहानसेच आहे पण अगदी बोलकं आहे.

गणकयंत्र वापरायला मुळीच हरकत नाही पण देवानं मेंदू म्हणून प्रत्येक माणसाजवळ जे गणकयंत्र दिलं आहे त्याचा उपयोग

न केल्यामुळं ते गंजून जाईल आणि मग माणसाला साधे-सुधे व्यवहार करतानासुद्धा परावलंबी बनावं लागेल. त्यापेक्षा आपण आपल्याजवळ असलेल्या गणकयंत्राने उत्तर तयार करावे आणि आधुनिक गणकयंत्राने ते बरोबर असल्याची खात्री करावी म्हणजे स्वावलंबनाला कधी धक्का लागणार नाही.

म्हणजे रोज आपल्या मेंदूला काहीतरी व्यायाम घडविला पाहिजे असंच ना ?

असंच. आणि खरं सांगायचं तर हेच वय असं आहे की या वयात जे तू पाठांतर करशील ते कायमचे राहील. उद्या मोठा झाल्यावर जर तू काही पाठांतर करू म्हणालास तर ते एकतर लवकर होणार नाही आणि झाले तर ते फारकाळ राहील असे नाही. ते पाठांतर राहावे असे वाटत असेल तर रोज त्या पाठांतराची आवृत्ती करावी लागेल. तशी ती आवृत्ती जर झाली नाही तर झालेले सर्व पाठांतर विसरून जाईल. पण बालपणी केलेले पाठांतर चिरकाल राहाते. पाठांतराने ज्याप्रमाणे स्मरणशक्ती वाढते त्याप्रमाणे वाणी शुद्ध होते. विचार शुद्ध होतात. विचार शुद्ध झाले की आचार शुद्ध होतो. ज्याचा आचार शुद्ध असतो तो गुणवान म्हणून समजला जातो. म्हणून म्हणतो तू आतापासूनच पाठांतराला सुरुवात कर.

काका, आज मला खूप चांगलं ऐकायला मिळालं. मी पुढच्या रविवारी येऊ का ?

ये. जरूर ये.

येतो मी काका.

*

वाचनालय प्रा. ६ -
१०९९ -
रु. १५

# दोन

मागल्या रविवारप्रमाणे माधव सकाळी आला. मी कठोपनिषद् वाचीत होतो. उपनिषद् टेबलावर ठेवले. माधव पुढे आला आणि मला नमस्कार करून तो खुर्चीवर बसला. त्याच्याकडे पाहात मी म्हटले, हं काय झाली तुझी शाळा चालू.

हो, सोमवारीच चालू झाली, पण दुपारीच सुटली. तसा अभ्यास असा काही झाला नाही. पण शिक्षकांची ओळख झाली. काही मित्रांची ओळख झाली. पहिला दिवस असाच गेला. पण मंगळवार-पासून मात्र खरी सुरुवात झाली,

या चार-पाच दिवसांत तुला काय काय शिकायला मिळालं.

काका, आमचे मराठीचे शिक्षक फारच चांगले आहेत. त्यांनी एकूण किती अभ्यास आहे. अभ्यास कसा करावा वगैरे गोष्टी सांगितल्या. त्याबरोबर त्यांनी हे पण सांगितले की, मराठी आपली मातृभाषा आहे म्हणून अभ्यासाचा आळस मुळीच करू नका. तुम्ही विद्यार्थी आहात. तुम्हाला खरोखरीच विद्या प्राप्त करावयाची असेल, तर तुम्ही नचिकेतासारखे व्हायला पाहिजे. एवढ्यात तास

संपला. नचिकेत कोण, कुठला, त्याने विद्या मिळविण्यासाठी काय केले ते सांगायचे राहूनच गेले. काका, तुम्हाला हा नचिकेत कोण आहे ते माहीत असेल. मला सांगता त्याने काय केले ते.

तेच मी वाचीत होतो. हे पुस्तक पाहिलेस. टेबलावरील पुस्तक त्याला दाखवीत मी विचारले.

हो, कठोपनिषद्.

हे एक उपनिषद् आहे आणि याच उपनिषदांत त्या नचिकेताची हकीगत आहे.

उपनिषद्– पूर्वी प्राचीन भारताचा इतिहास वाचताना मला आठवतं गुरुजींनी वेद, उपनिषदे आणि पुराणे यांच्याबद्दल आम्हाला माहिती सांगितली होती. आता पण ती आठवत नाही. उपनिषदे म्हणजे काय ते तुम्ही सांगाना.

वेद तुला माहीत आहेत.

होय. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत.

या वेदांमध्ये मंत्र असून त्या मंत्रांमध्ये या विश्वाचे ज्ञान आहे. ह्या ज्ञानाबद्दल मोठमोठ्या जाणत्या ऋषींनी बरीच चर्चा केली आणि वेदामध्ये असलेले ज्ञान एकमेकाला दिले. ही जी चर्चा आहे ती निरनिराळ्या ठिकाणी आणि निरनिराळ्या ऋषींनी केली. त्यावेळी त्यांचे शिष्यसुद्धा त्या ठिकाणी होते. ही चर्चा म्हणजे ही उपनिषदे आहेत असे समज. उपनिषदांतील ज्ञान व्यवहारात कसे आणावयाचे. त्याचा प्रत्यक्ष आचार कसा करायचा हे गोष्टीरूपाने पूर्वीच्या ऋषींनी स्पष्ट केले: त्या गोष्टींच्या संग्रहाला पुराणे असे म्हणतात.

वेदांतील अगर उपनिषदांतील ज्ञान आचारात आणायचे म्हणजे काय करावयाचे ते नाही कळलं मला.

वेद किंवा उपनिषदे असे सांगतात– सत्य बोलावे. खोटे बोलू नये. तुला एक उदाहरण देतो– एका गाईला ठार मारावी म्हणून एक कसाई तिच्या पाठीमागे लागला आहे. गाय धावत तुझ्या समोरून गेली. थोड्या वेळाने तो कसाई तुझ्या समोर येऊन तुला विचारू लागला. काय रे बाळ एक गाय इकडून जाताना तू पाहिलीस का ? तर तू काय उत्तर देशील.

जिकडे गाय गेली त्या दिशेला बोट करून सांगेन. तिकडे गेली म्हणून.

नाही ! नाही ! ! असं सांगितलंस तर तो कसाई त्या बाजूला जाऊन गाईला मारील. पण गाईच्या हत्येचा दोष मात्र तुला लागेल. हे असं सांगण्यापेक्षा गाय दुसऱ्याच मार्गानं गेली असं सांगून तू गाईचे प्राण वाचवू शकशील. ते तुझे बोलणे जरी दिसायला असत्य असले तरी तू एका प्राण्याचा जीव वाचवतोस म्हणून या ठिकाणी असत्य हेच सत्य समजावे. स्वार्थासाठी खोटं बोलणं हा दोष आहे. परंतु स्वार्थरहित परक्याच्या फार मोठ्या हितासाठी खोटं बोलणं हे खरं बोलणं होय.

किती चांगला विचार आहे या उपनिषद-पुराणांतून.

हा तुला मी किरकोळ म्हणून भाग सांगितला. आपल्यासारख्या सामान्य माणसांना गोष्टीतून कल्याण कशात आहे हे सांगणं हे उपनिषदं आणि पुराणांचं काम आहे.

मग तुमच्या हातांत आहे ते उपनिषद आहे.

कठोपनिषद्– सगळीच उपनिषदे चांगली आहेत. त्यांचा जरूर अभ्यास केला पाहिजे. ती चांगली समजावून घेतली पाहिजेत.

मगाशी तुम्ही म्हणालात ती नचिकेताची गोष्ट याच उपनिषदात आहे ना ?

होय– याच उपनिषदांत आहे.

कोण होता हा नचिकेत ? त्यानें विद्या मिळविण्यासाठी एवढे काय दिव्य केले ? मला सर्व काही सांगा.

सांगतो. सांगतो. मी तर असे म्हणतो की, ज्याला खरोखरीच विद्येची तळमळ आहे त्यानें या नचिकेताची गोष्ट एकदा तरी वाचलीच पाहिजे. म्हणजे त्याला कळेल की, विद्या प्राप्त करण्यासाठी काय कष्ट पडतात.

काका, नचिकेतानें कोणती विद्या मिळविली.

त्यानें ज्याला अध्यात्मविद्या असं म्हणतात ती विद्या मिळविली.

त्याचे गुरु कोण होते ?

त्याचे गुरु होते यमराज.

यमराज ! बाप रे.


का. यमाचं नाव घेतलं म्हणून घाबरलास की काय ?

यमराज गुरु ? यमाचं नाव काढलं की जरा भीतीच वाटते.

तसं भीती वाटण्यासारखं काही नाही. मी तुला नचिकेताची सर्वच हकीगत सांगतो, म्हणजे तुला पटेल की, यमराज किती मोठा विद्वान आणि न्यायी आहे ते.

वाजश्रवस नावाच्या ऋषींचा नचिकेत हा मुलगा. तो अतिशय हुषार आणि सत्यप्रिय होता. एकदा त्याच्या वडिलांनी एक यज्ञ केला. या यज्ञाच्या अखेर आपली सर्व संपत्ती यज्ञ करणाऱ्यानें दान करायची असते. वडिलांनी सर्व वस्तू दान केल्या. तेव्हा नचिकेत वडिलांना म्हणाला माझे दान तुम्ही कोणाला करणार ?

त्याच्या बोलण्याकडे प्रथम वडिलांनी लक्ष दिलं नाही. म्हणून त्याने पुन्हा विचारले. वडिलांना तेव्हा त्याचा राग आला. ते त्याला म्हणाले, मी तुला यमाला दान करून टाकणार आहे. पुढे वडिलांची आज्ञा घेऊन नचिकेत यमाकडे आला. पण यम त्यावेळी बाहेर गेला होता. नचिकेताची कोणी विचारपूसदेखील केली नाही. तो यमाच्या दारात बसून राहिला. तिसऱ्या दिवशी यम



आला. त्याने पाहिले एक ऋषीकुमार दारात बसला आहे. तो विद्यार्थी आहे. त्याने त्या ऋषिकुमाराला हाक मारली. ऋषिकुमाराने डोळे उघडले. उठून त्याने यमाला नमस्कार केला आणि त्याला सांगितले वडिलांच्या आज्ञेने मी या ठिकाणी आलो. तीन दिवस झाले. तुम्ही बाहेर गेल्याने मला आपले दर्शन लाभले नाही. मला नचिकेत म्हणतात.

गेले तीन दिवस तू या ठिकाणीच बसून आहेस. तुला अन्न–पाणीदेखील कोणी विचारलं नाही ?

नाही यमराज. केवळ आपल्या दर्शनासाठीच मी या ठिकाणी आलो.

कुमारा, एखाद्या अतिथीला असे उपाशी ठेवणे हा फार मोठा अपराध आहे. मला क्षमा कर.

बापरे ! काका यमाने त्या बालकाची क्षमा मागितली.

होय. आपली चूक लक्षात येताच क्षमा मागणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. आणि ते जर केले नाही तर तो अपराध आणखीनच मोठा होतो. यमाला हे सर्व माहीत होतं म्हणून यमाने नचिकेताची क्षमा मागितली.

मग पुढे काय केलं यमानं ?

यमानं त्याला तीन वर दिले आणि सांगितलं तुझ्या इच्छेला येईल ते तू मागून घे.

मग नचिकेतानं काय मागितलं.

नचिकेतानं प्रथम मागितलं ते असं. आपले वडील आपल्यावर रागावले होते. त्यांचा राग शांत होऊन मी येथून परत गेलो म्हणजे माझ्यावर पूर्वीप्रमाणेच प्रेम करोत. यमाने होय म्हटले. मग त्याने दुसरा वर मागितला. तो म्हणाला ज्या अग्नीमुळे मनुष्य

जगतो, खातो, पितो किंवा त्याला पुष्कळ आयुष्य लाभतं त्या अग्नीची माहिती मला सांग. मला त्या अग्नीचे ज्ञान दे.

हा अग्नि असतो कोठे ?

हा अग्नि प्रत्येक प्राण्याच्या शरीरात असतो. तो कायम कसा राहील याचे ज्ञान फक्त यमालाच आहे. तूच बघ. आपल्याला थोडासा ताप आला तरी आपण औषधाला धावत जातो आणि थोडासा कमी झाला तरी आपली धावपळ होते. हा अग्नि विझला की मनुष्य मरतो. हाच अग्नि शरीरात अन्नाचे पचन करतो. गीतेच्या पंधराव्या आध्यायातला श्लोक तुला येतो ना ?

कोणता श्लोक—

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ।।

हो येतो ना.

त्यामध्ये या अग्नीचे वर्णन आहे. नचिकेताचा प्रश्न ऐकून यम खूष झाला आणि त्याने त्याला केवळ अग्नीचीच माहिती दिली असं नाही. तर आजपासून त्या अग्नीला नचिकेत म्हणतील. तुझ्या नावाने हाक मारतील असे म्हणून त्याचा गौरव केला.

नचिकेताला किती आनंद झाला असेल नाही ? मग तिसरा वर त्याने मागितला का ?

हो तर, मागितला. नचिकेत म्हणाला, ब्रह्मविद्या सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ विद्या आहे. ती विद्या देवादिकांनासुद्धा येत नाही. ती तू मला दे. कारण ती विद्या फक्त तुलाच माहीत आहे. नचिकेताचा हा प्रश्न ऐकून यम त्याला म्हणाला, ती विद्या फार अवघड आहे. त्यापेक्षा तू दुसरे काहीही माग मी ते तुला देईन.

मग नचिकेताने दुसरे काय मागून घेतले ?

नचिकेता हा साधासुधा विद्यार्थी नव्हता. यमाने त्याला पुष्कळ गोष्टी देऊ केल्या. यम म्हणाला, हे बघ नचिकेता तू मागशील तेवढे आयुष्य मी तुला देतो पण तू या विद्येचा आग्रह धरू नकोस.

नचिकेता म्हणाला जी विद्या देवांनासुद्धा माहीत नाही आणि ती तुला सर्व माहीत आहे. असे असताना मी त्या विद्येचा आग्रह का नको धरू. तेव्हा यम त्याला पुन्हा म्हणाला, हे बघ नचिकेता तुला हवे असेल तर मी तुला पृथ्वीचे राज्य देतो. दास-दासी हत्ती घोडे, सोने-चांदी हिरे-माणके जे काही हवे असेल ते देतो. पण हा हट्ट तू करू नकोस.

यमाने नचिकेताला सर्व काही द्यावयाची तयारी केली होती. मग नचिकेताने यमाची विनंती मान्य केली का ?

नाही. नचिकेताने सांगितले या ब्रह्मविद्येशिवाय मला काहीही देवू नकोस. तू मला जो तिसरा वर देणार आहेस त्या वराने मला ही एकच विद्या दे. मला दुसरे काही नको.

मग यम काय म्हणाला ?

यमाने अनेक प्रकारची लालूच दाखवून त्याची जवळ जवळ परीक्षाच घेतली. ज्या वेळी विद्यार्थ्याला विद्येशिवाय दुसरे काहीही नकोसे वाटते तेव्हा त्याला खरा विद्यार्थी म्हणतात आणि खरं सांगायचं तर अशाच विद्यार्थ्याला खऱ्या विद्येचा लाभ होतो. केवळ परीक्षा आहे. त्यात उत्तीर्ण व्हायला पाहिजे. नाही झालो तर आई-बाबा रागावतील म्हणून शाळेत जाणारे आणि अभ्यास करणारे हे परीक्षार्थी. ते विद्यार्थी नव्हेत.

विद्यार्थी म्हणजे काय हे मला आज समजलं. आम्ही शाळेत जातो. पण अभ्यासाशिवाय दुसऱ्या आणि नको असलेल्या गोष्टी-तच आम्ही अधिक लक्ष घालतो. नचिकेतासारखा पक्का निश्चय

पाहिजे यात शंका नाही. मग काका यमाने नचिकेताला ब्रह्मविद्या शिकविली का हो ?

हो. कारण यमाला दुसरं काहीच करता येण्यासारखं नव्हतं. नचिकेताला त्याने सर्व ब्रह्मविद्या शिकविली. नचिकेतही मनापासून शिकला. आपला विद्यार्थी असा उत्तम प्रकारे विद्यावान झाल्याचे पाहून यमाला खूप आनंद झाला. या विद्येमुळे नचिकेत अमर झाला. या उपनिषदानें त्याचा गौरव केलाच आहे. अशी विद्या आपल्याला मिळावी आणि आपल्यालाही मोठं होता यावं म्हणून अशा उपनिषदांचा अभ्यास केला जातो.

काका, मला नचिकेताची गोष्ट फारच आवडली. आम्ही विद्यार्थ्यांनी त्याचेच अनुकरण केले पाहिजे.

अगदी बरोबर आहे तुझे म्हणणें.

मला या गोष्टीत एक शंका आहे. विचारू का ?

विचार, खुशाल विचार.

नचिकेत यमाकडें आला. त्याला तीन दिवस उपाशी राहावे लागले हे ऐकून यमाला आपण फार मोठा अपराध केला आहे असं वाटलं, असं तुम्ही म्हणालात. पण तसं पाहिलं तर नचिकेत तर एवढासा मुलगा होता. त्याचा यमाने कांय अपराध केला ?

फार चांगला प्रश्न विचारलास. म्हणजे तुझं गोष्टीकडे चांगलं लक्ष होतं.

गोष्टी मीं अगदी लक्ष देवून ऐकतो.

आपल्या भारतीय संस्कृतीत जे आचार विचार कसोशीने पाळले जातात, त्यामध्ये आपल्याबरोबर दुसऱ्याच्या अडचणीचा-सुद्धा विचार केला आहे. आपल्याला जसं दु:ख असतं, तसं दुसऱ्याला देखील असतं, असं आपली संस्कृती शिकविते. याच विचारांतून

विद्यार्थ्यांच्या आणि प्रवास करीत आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्याच्या अडचणींचा विचार केला आहे. विद्यार्थ्याची मोठी अडचण म्हणजे विद्या शिकताना त्याला ज्याप्रमाणे वह्या, पुस्तके पाहिजेत त्याप्रमाणे कमीत कमी दोन वेळा अन्न मिळालं पाहिजे.

उपाशी पोटी अभ्यासाकडे कसे लक्ष लागेल ?

म्हणजे तुला पण आईनं उपाशी ठेवलं होतं वाटतं.

नाही. काका, आईनं नव्हतं मला कधीच उपाशी ठेवलं, पण रोज अकरा वाजता शाळेत जायचं म्हणून दहा वाजताच जेवतो. दुपारी मग भूक लागते. मधल्या सुट्टीकडे मग लक्ष लागतं आणि चवथा तास कधी संपतो असं वाटतं. खरं म्हणजे भुकेमुळे त्या तासाला नीट लक्ष लागत नाही. मला जसं वाटतं तसंच दुसऱ्या मुलांनादेखील वाटत असेल म्हणून म्हटलं मी.

खरं आहे तू म्हणतोस ते. भुकेच्या पोटी कशाकडेच लक्ष लागत नाही. विद्यार्थी आणि पाहुणा यांची ही अडचण लक्षात घेवून असा एक नियमच करून टाकला होता पूर्वी. असा अचानक आलेल्या पाहुण्याला अतिथी असं म्हणतात. अशा अतिथीचा सत्कार करणं हे संसारी माणसाचं महत्त्वाचं कर्तव्य समजण्यात येत असे. तशात तो विद्यार्थी असेल तर त्या गृहस्थाने प्रत्यक्ष विद्यादेवीचाच अपमान केला असे समजण्यात येई. त्याकाळी विद्या-देवीचा अपमान करणं म्हणजे विद्येला मुकणं होय. घरातल्या लोकांना विद्या येत नसे. विद्या आली तर तिचा उपयोग कसा करावा ते कळत नसे. हा नियम देव आणि मानव या सर्वांना सारखा होता. या कठोपनिषदात असं लिहिलं आहे की, अग्नीला यथायोग्य मान दिला नाही तर तो घरात घुसून ज्याप्रमाणे घरा-दाराची राखरांगोळी करतो त्याप्रमाणे अतिथीचा योग्य सत्कार

केला नाही तर तो त्या माणसाच्या घरातली सर्व पुण्याई घेवून जातो. त्या घरातल्या आनंदाची राख करतो. यमाने काय किंवा त्याच्या घरातल्या माणसांनी काय नचिकेताची विचारपूस देखील केली नव्हती. हा साधासुधा दोष नव्हता. या सर्व दोषाला यमच कारण होता. त्यामुळे यम घाबरला. यम म्हणजे फार मोठ्या पुण्याईचा साठा होता. त्याची ही सर्व संपत्ती क्षणात नाहीशी झाली असती. म्हणून आजही अनेक लोक विद्यार्थ्याला मदत करायला नेहमी पुढे होतात.

आमच्या घरी आमची उमा आहे ना ? तिचा मुलगा पाचवीत गेला. मोलमजुरी करून तिला कितीसे पैसे मिळणार. परवा ती आईला सांगत होती, बाई ह्या मुलाला एकदा शहाणा केला की सुटले. पण ह्याच्या शाळेची पुस्तकं आणि वह्या यांच्या खर्चातून मी वाचेन तेव्हा. आता पोटाला खाऊ का ह्याच्या पुस्तकाला पैसा देवू. काही सुचत नाही. तेव्हा आई तिला म्हणाली, उमाबाई, अशी कितीशी पुस्तकं लागणार आहेत त्याला. हे बघा, तो नियमित शाळेत जावून अभ्यास करणार असेल तर तुम्ही त्याच्या वह्या, पुस्तकांची काळजी करू नका. मी देते त्याला सर्व आणून. मुलाला चांगलं शिकवा. आई असं का म्हणाली ते मला आज कळलं.

अरे पूर्वी तर असे गरीब विद्यार्थी असत. त्यांच्या जेवणाची सोय एक एक दिवस श्रीमंत लोक करीत. आठवड्यातला एक दिवस त्या गृहस्थांकडे जेवायला जायचे. त्याला वारावर जेवणे असे म्हणतात. ज्यांची अशी सोय होत नसे ते विद्यार्थी दारोदार हिंडून दुपारी अन्न मागून आणीत आणि त्यावर आपली भूक भागवीतः याला मधुकरी मागणे असं म्हणतात.

आपल्या देशातल्या काही मोठ्या लोकांची चरित्रे मी वाचली आहेत. त्यांत काहींनी वार लावून तर काहींनी मधुकरी मागून विद्या केल्याचे वाचले. कष्ट कितीही पडले तरी चालतील, पण विद्या सोडायची नाही, असा त्यांचा बाणा होता.

म्हणूनच ही माणसे मोठी झाली. विद्या मिळवायची तर कष्टाची पर्वा करता कामा नये.

काका परवा तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे मी शाळेच्या दुसऱ्या दिवसापासून अभ्यासाला सुरुवात केली आहे. मी आणखी काय करू ?

आणखी बरंच करण्यासारखं आहे. सांगेन मी तुला हळू हळू.

*

# तीन

आज रविवार. मी माधवची वाटच पाहत होतो. तेवढ्यात हातात एक वही घेवून तो आला. मागच्यापेक्षा तो विशेष आनंदात होता. नेहमीप्रमाणे तो आला आणि नमस्कार करून खुर्चीवर बसला. तेव्हा मीच विचारले, काय माधव आज विशेष आनंदात दिसतोस.

आज मला एक विशेष असे तुम्हाला दाखवावयाचे आहे. मी माझ्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले आहे. या वेळापत्रका-प्रमाणे अभ्यास केला म्हणजे मी कधीही मागे पडणार नाही. हे बघा, असे म्हणून मला त्याने त्याची वही दाखविली. एका पाना-वर त्याच्या शाळेचे वेळापत्रक होते आणि दुसऱ्या पानावर त्यानें नित्याच्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले होते. ते पाहून वही माधवच्या हातात देत मी म्हटले. वेळापत्रक चांगले आहे, पण या वेळापत्रकात अजून बऱ्याच गोष्टी लिहावयाच्या राहिलेल्या दिसतात.

या वेळापत्रकात आता तर सर्व विषय आले आहेत. एकही

विषय मी विसरलो नाही. मग काय राहिलं.

आता तू लिहिलं आहेस. सकाळी ६ वाजता लेखनाचा अभ्यास करावयाचा. दुपारी शाळेत. संध्याकाळी ७ ते ९ अभ्यास, नंतर जेवण व झोप. यामध्ये सकाळी लिखाणाच्याऐवजी पाठांतराचा अभ्यास पाहिजे आणि व्यायामाचा अभ्यास तर यात नाहीच. शिवाय आईच्या कामासाठी वेळ वगैरे दिलेला दिसत नाही.

काका, तुम्हीच सांगा, माझं वेळापत्रक कसं असावं ते.

हे बघ, विद्यार्थी म्हटला की त्याने पहाटे ५ नंतर झोपता कामा नये. ५ ते ६ पाठांतराचा अभ्यास. ६ वाजता व्यायाम.

व्यायाम म्हणजे जोर बैठका—

नाही. सूर्यनमस्कारासारखा व्यायाम नाही. त्याने प्रकृती सुधारते. बुद्धी चांगली होते आणि स्मरणशक्तीपण वाढते. रोज पंचवीस नमस्कार अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने घातले पाहिजेत. कमीत कमी वयाच्या पंचवीसाव्या वर्षापर्यंत तरी. या व्यायामा-नंतर स्नान आणि मग पुन्हा व्यायाम.

पुन्हा नमस्कार घालायचे ?

नाही, नमस्कार हा शरीराचा व्यायाम झाला. स्नानानंतर मनाचा व्यायाम करायचा.

मनाचा व्यायाम ? तो कसा करायचा ? मला तर यातलं काहीच माहिती नाही.

शरीर ज्याप्रमाणे सशक्त पाहिजे त्याप्रमाणे मनही सशक्त पाहिजे. शरीर चांगलं असून मन जर कमकुवत राहिलं तर या शरीराकडून काहीही काम व्हायचं नाही. एखादेवेळी दुबळं शरीर असलं तर चालेल पण मन दुबळं झालं की, त्याच्या आयुष्यात काहीही चांगलं होणार नाही.

पण काका मन तर शरीराच्या आत असतं. त्याचा व्यायाम कसा करायचा ?

हे बघ, आपल्याकडे अनेक महापुरुष होऊन गेले. त्यांनी उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले आहेत. त्या ग्रंथामध्ये सर्वांना सुखावह होतील अशा अनेक गोष्टी कशा करावयाच्या त्यांचे मार्गदर्शन आहे: ह्या ग्रंथांचं वाचन, मनन हा आहे मनाचा व्यायाम. तुला आता समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक येतात. मनाचे श्लोक लक्ष देवून म्हणणं आणि त्याच्या अर्थाकडे लक्ष पुरविणं याला मनाचा व्यायाम म्हणतात. हा नियमित केला पाहिजे.

मनाचे श्लोक मला आवडतात. आणखी असे श्लोक वगैरे आहेत का ?

आहेत तर. ज्ञानदेवांचे पसायदान, रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र, शंकराचार्यांची काही स्तोत्रे, भगवद्‌गीता, शिवमहिम्न, गंगालहरी गणपती अथर्वशीर्ष असे कितीतरी प्रकार आहेत. ज्ञानदेवांचे पसायदान तर एक अलौकिक प्रार्थना आहे. सर्व प्राणिमात्रांचे भले व्हावे अशी ज्ञानदेवांनी केलेली ही प्रार्थना आहे. तसं पाहिलं तर प्रत्येक स्तोत्र आपल्या परीनें मोठे आहे. या योगे दोन फायदे होतात.

दोन फायदे काय ?

एक आपल्या मनाची शक्ती वाढते. मनातून वाईट विचार निघून जातात. दुसऱ्याचं नेहमी चांगलं व्हावं असेच विचार आपल्या मनात येतात. या विचाराप्रमाणे मग आपल्याकडून आचार घडतात. चांगल्या आचारांनी मनुष्य खूप मोठा होतो. हा एक फायदा आणि मनाची निर्णयशक्ती वाढते त्यामुळे कुठल्याही वेळी आपण अचूक आणि बरोबर निर्णय घेऊ शकतो. त्यामुळे

आपल्या चुका कमी होतात. याशिवाय आणखी एक फायदा मी तुला सांगितलाच आहे. लक्षात आहे ?

नाही.

आपली वाचा उत्तम होते. शब्दोच्चार स्पष्ट होतात. त्यामुळे आपले बोलणे ऐकणारा कधी संभ्रमात पडत नाही.

खरंच मनाच्या आणि शरीराच्या व्यायामाचे महत्त्व मला कळलेच नव्हते. रोजच्या वेळापत्रकात हा व्यायाम निश्चितच पाहिजे. आणखी काय राहिले वेळापत्रकात ?

आता घरची काही कामे असतात. आईला मदत करायची

---

टीप :–

पाठांतरासाठी– मराठी

१) मनाचे श्लोक
२) करुणाष्टके
३) भीमरूपी स्तोत्र
४) ज्ञानदेवांचे पसायदान
५) व्यंकटेश स्तोत्र
६) निरनिराळ्या आरत्या
७) भोजन प्रार्थना
८) शुभं करोती–सायं प्रार्थना

संस्कृत

१) संकटनाशन स्तोत्र
२) रामरक्षा
३) शिवमहिम्न
४) गंगालहरी
५) अन्नपूर्णा स्तोत्र
६) सूर्याष्टक
७) गणपती अथर्वशीर्ष
८) पुरुषसूक्त
९) श्रीसूक्त
१०) प्रात:स्मरण
११) भगवत् गीता
१२) मंत्रपुष्पांजली
१३) शान्तिप्रार्थना
१४) शंकराचार्यांची स्तोत्रे

असते. आईनं बाजारातून एखादी वस्तू आणायला सांगितली तर तू काय सांगणार, माझ्या वेळापत्रकात ती गोष्ट नाही म्हणून ? म्हणून सकाळी आणि संध्याकाळी थोडा वेळ घरच्या कामासाठी ठेवलाच पाहिजे. घरचे काम नसेल तेव्हा तू खुशाल अभ्यास कर. आई सकाळपासून किती काम करते ! म्हणून तर तुला जेवून वेळेवर शाळेत जाता येते.

त्या गोष्टीचा पण मी कधीच विचार केला नाही.

तू या घरच्या कामासाठी दिलेल्या वेळात आईला जर विचारलंस की आई काही काम करायचं का ? सांग. अरे, नुसत्या एवढ्या विचारण्यानं आईला केवढा आनंद होईल. तिला आपल्या मुलाचं कौतुक वाटेल.

खरं आहे काका. आई सकाळी किती लवकर उठते. सारखं काम करत असते. आम्ही नुसते आयतोबासारखे जेवायला हजर. आणि जेवतानासुद्धा आमच्या तक्रारी. आज भाजीत मीठ जास्त झालं आहे तर कधी मीठच नाही. तरीपण ती अगदी हसतमुखानं सर्वकाही ठीक करते. अशा वेळी मी तिला थोडीशी तरी मदत केलीच पाहिजे. मला पटलं हे.

चांगलं झालं. आता संध्याकाळी तू लिहिलं आहेस. टी. व्ही. पाहणे, जेवण, रात्री अभ्यास यामध्ये खेळणं वगैरेचा उल्लेखसुद्धा नाही.

टी. व्ही. चे कार्यक्रम तर संध्याकाळीच सुरू होतात. मग काय करायचं ? टी. व्ही. च्या कार्यक्रमांचे आम्हाला एवढे आकर्षण आहे की संध्याकाळी टी. व्ही. केव्हा सुरू होतो याची आम्ही शाळेतून आल्यापासूनच वाट पाहत असतो. आणि त्यावेळी खेळायला जाणं वगैरे कसंतरीच वाटतं. माझे सगळेच मित्र संध्या-

काळी टी. व्ही. बघण्यात गुंग असतात.

टी. व्ही. पाहू नये असं मी मुळीच म्हणत नाही. जरूर पाहावा. पण तो पाहताना आपले आरोग्य आणि अभ्यास यांचा विचार प्रथम करावा ज्या कार्यक्रमातून खरोखरीच काही घेण्यासारखे असेल अशा वेळी टी. व्ही जरूर पाहावा. पक्ष्यांचे जीवन, वन्य पशूंचे जीवन, एखाद्या देशातील एखाद्या स्थळाची माहिती, काही वैज्ञानिक घटना, परीक्षेत उत्तम गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती, वगैरे गोष्टी मुलांनी आणि विशेषतः विद्यार्थ्यांनी तर जरूर पाहाव्यात. त्याचप्रमाणे आपण एखादी कला शिकतो आहोत तर त्या कलेतील निष्णात लोकांच्या मुलाखती, प्रात्यक्षिके हे पाहण्यास मुळीच चुकू नये. अर्थात हे कार्यक्रम आदल्या दिवशी स्पष्ट केले जातात. त्यामुळे आपला कार्यक्रम ठरविणे सोपे जाते.

मग संध्याकाळी आम्ही विद्यार्थ्यांनी काय करावं ?

संध्याकाळी घरी येताच प्रथम शाळा, अभ्यास ह्या गोष्टी डोक्यातून दूर कराव्यात. भूक लागली असल्यास काही खावे आणि उघड्या मैदानात खेळायला बाहेर पडावे. वर आकाश आणि खाली जमीन असेल अशाच ठिकाणी खेळावे. खेळताना अंगाला माती लागेल म्हणून घाबरण्याचे काहीही कारण नाही. उलट मातीमध्ये मुद्दाम खेळावे. अगदी सूर्यास्तापर्यंत खूप खेळावे. घरी यावे, हात-पाय तोंड धुऊन स्वच्छ व्हावे. संध्याकाळी आपण ज्यांना आदर्श मानतो त्यांना वन्दन करावे. यात आई-वडिलांना नमस्कार करायला मुळीच लाजू नये आणि चुकवूही नये.

आई, वडील, देव यांना नमस्कार का करायचा ? आई-वडील ठीक. पण देव तर दिसत नाही. मग न दिसणाऱ्या देवाला

नमस्कार करण्यात काय अर्थ ?

आता तू शाळेत जातोस. तुला कोणी काही दिलं तर तू त्याचे लगेच आभार मानतोस. कुणी मदत केली तरी तू त्याचे आभार मानतोस. होय की नाही.

हो. तसे ते मानले नाहीत तर मुलं मला नावं ठेवतील. मोठी माणसेसुद्धा म्हणतील, हा एवढा मोठा झाला पण रीतभात काही नाही. त्यांचे उपकार मानलेच पाहिजेत असं आम्हाला शिकवलंय.

मग मला सांग, तुला हे डोळे, कान, नाक, हात, बुद्धी कोणी दिली? तुझ्या शरीरात रक्त सतत प्रवाहित राहावं, श्वासोच्छ्वास नियमित व्हावा, वगैरे कोणी केलं ? त्याचं नाव माहीत आहे तुला ?

नाही. पण अशी एखादी महान शक्ती आहे. या शक्तीमुळं हे सर्व प्राप्त झालं आहे त्या शक्तीचं नाव मला माहीत नाही.

मग ज्या शक्तीनं तुला हे सर्व दिलं त्या शक्तीचे निदान आभार तर मानले पाहिजेत की नाही ! ते आभार कसे मानायचे आणि त्या शक्तीला काय नाव द्यायचं हे प्रत्येकाच्यां इच्छेवर सोपविलं आहे. आपण त्या शक्तीला देव म्हणू, काही लोक बुद्ध म्हणतील, काही पिता म्हणतील, काही अल्ला म्हणतील. पण काहीतरी नाव घेऊन त्याला हाक मारतील आणि मग त्याचे आभार मानतील. आता प्रत्येकाच्या आभार मानायच्या तऱ्हा निरनिराळ्या आहेत. कोणी नमस्कार करतील, कोणी फुलं वाहातील, कोणी नमाज पडतील, कुणी त्याच्यापुढे नम्र होऊन क्षमा मागतील. त्या शक्तीचं मोठेपण आणि आपल्यावर केलेले उपकार विसरणार नाहीत.

ही गोष्ट खरी आहे. आईवडिलांनी तरी माझ्यासाठी काय काय

केलंय. लहानाचा मोठा केला, लाड पुरवले, आजारपणात काळजी घेतली, सर्व काही केलं.

म्हणून तर देवाच्या अगोदर आई-वडिलांना नमस्कार करावा असं सांगितलं आहे. उपनिषदामध्ये याचा क्रम दिलाय. त्याप्रमाणे मुखाने म्हणावे आणि नमस्कार करावा. आपण लहान आहोत याची सदैव जाणीव ठेवावी.

उपनिषदांनी सांगितलेला क्रम मला सांगा, मी वहीत लिहून घेतो, पाठ करतो आणि त्याप्रमाणे आचरणही करतो.

उपनिषदांनी असा क्रम सांगितला आहे.

मातृदेवो भव ।

पितृदेवो भव ।

आचार्यदेवो भव ।

आणि त्यानंतर सर्वेभ्यो देवेभ्यो नमः

आचार्य म्हणजे कोण ?

आचार्य याचा अर्थ गुरु, शिक्षक असा आहे. गुरुजी आपल्याला विद्या देतात. तेव्हा त्यांचे आभार मानणे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. तुला नाही असं वाटत ?

असंच वाटतं. काका, परवा आमच्या वर्गात एक गम्मत झाली.

काय झालं ?

तासाची घंटा झाली. आमचे शिक्षक वर्गात आले. आम्ही सर्वजण उभे राहिलो आणि एकसुरात 'नमस्ते' असे म्हणून गुरुजींना नमस्कार केला. गुरुजी म्हणाले, 'बसा. त्यानंतर आम्ही बसलो.

अगदी योग्य तेच केलेत.

पण आमच्या वर्गात एक मुलगा आहे. त्याचे वडील फार मोठे

सरकारी अधिकारी आहेत. तो रोज गाडीतून शाळेत येतो. आणि शाळा सुटल्यावर गाडी त्याला न्यायला येते. तो मुलगा मागच्या बाकावर बसतो. अभ्यासाकडे तर लक्ष देतच नाही पण इतर मुलांना मात्र खुणा करून त्याचे अभ्यासातले लक्ष तो दुसरीकडे वळवतो. गुरुजी आले तरी तो उठत नाही. नमस्ते म्हणत नाही. म्हणून आम्ही त्याला विचारलं, तो असं का करतो. तर तो म्हणाला, माझे वडील फार मोठे अधिकारी आहेत. आम्ही श्रीमंत आहोत. घरी मला सगळे आदराने अहो-जावो म्हणून नमस्कार करतात. दुसऱ्यांना नमस्कार करायला मला मुळीच आवडत नाही.

एकदा आमचे गणिताचे शिक्षक वर्गात येताच आम्ही नेहमी-प्रमाणे नमस्ते म्हणून बसलो. पण त्याने काहीच न केल्याने गुरुजींनी त्याला विचारलं, वर्गाची ही शिस्त आहे ती तू का पाळत नाहीस. त्याने सरळ उत्तर द्यावयाच्या ऐवजी शिक्षकांना मी कोण आहे वगैरे सांगितलं आणि पुढे म्हणाला, ही असली शिस्त-बिस्त मला आवडत नाही. तुम्हाला आम्ही का म्हणून नमस्ते म्हणायचं तुम्हाला आम्ही पैसे देतो. तुम्ही आम्हालाच नमस्ते केलं पाहिजे. कारण तुमच्या शिकविण्याचा मोबदला आम्ही तुम्हाला द्यायचा आणि उलट तुम्हालाच नमस्ते म्हणायचं! ही कुठली शिस्त? तेव्हा आमचे गुरुजी म्हणाले, तू श्रीमंत असलास, तुझे वडील मोठे अधिकारी असले तरी तू या ठिकाणी इतरांच्याप्रमाणे विद्यार्थी म्हणूनच आला आहेस. शाळेला आणि वर्गाला काही शिस्त आहे आणि ती तुला पाळलीच पाहिजे. तुला ती शिस्त पाळायची नसेल तर या वर्गात तू बसू नको. मुख्याध्यापकांकडे जा. तो मुलगा नंतर मुख्याध्यापकांकडे गेला आणि आमच्या

गुरुजींच्या विरुद्ध तक्रार केली. इतकेच नव्हे तर त्याने त्यांना सांगितले, तुम्ही बाकीच्या मुलांनादेखील विचारा. पुढे तास संपला. गुरुजी निघून गेले. दुसऱ्या तासाला मुख्याध्यापक आले. मुलांनी खरी हकीगत सांगितली. तेव्हा त्या मुलाला मुख्याध्यापकांनी शिक्षा केली. पुढे एके दिवशी त्याचे वडील शाळेत आले. मुख्याध्यापकांना भेटले तेव्हा मुख्याध्यापक त्यांना म्हणाले, तो तुमचा मुलगा आहे पण, पण या शाळेत तो विद्यार्थी आहे. आज तो शिक्षकांना उलट बोलला, उद्या तो तुम्हाला बोलेल. त्यावेळी तुम्ही म्हणाल, शाळेत जाऊन हेच शिकलास काय ? उद्या तुमचा होणारा अपमान टाळण्यासाठी मीच त्याला शिक्षा केली आहे. तुम्ही वाटल्यास मुलाला दुसऱ्या शाळेत घालू शकता. तुम्ही म्हणालात तर त्याचा दाखला मी या क्षणी देतो. तुमच्या एका मुलामुळे मला माझ्या शाळेतील हजार मुलांना बिघडवायचं नाही.

त्यानंतर तो मुलगा आणि त्याचे वडील मुख्याध्यापकांबरोबर वर्गात आले. त्याचे वडील खूप रागावले होते. ते त्याला म्हणाले, या वर्गातल्या प्रत्येक मुलाला नमस्कार कर. मी चुकलो म्हणून या सर्वांची आणि सर्व शिक्षकांची माफी माग. तरच तुला माझ्या घरी येता येईल. त्या मुलाने त्याप्रमाणे केले. पण आमच्या वर्गातली मुले अजूनही त्याच्याजवळ प्रेमाने वागत नाहीत. अशा स्थितीत मी काय करावें.

हे बघ, माधव, एखादा मुलगा वाईट असेल परंतु कोणत्यातरी कारणाने त्याच्यामध्ये जर परिवर्तन होऊन तो चांगला वागू लागला तर त्याला आपण जवळ करावे. तसे तुम्ही केले नाहीत तर त्या मुलाला असे वाटेल की पूर्वी ठीक होतं. आता मी चांगला

वागतो तरीसुद्धा मला कोणी विचारीत नाही. त्यापेक्षा मी पूर्वी वागत होतो, तसाच वागलो तर काय हरकत आहे. तुमच्या अशा वागण्यानं तो मुलगा पुन्हा पहिल्या वळणावर जाईल. शाळा हे मुलांच्यावर संस्कार करणारं एक पवित्र क्षेत्र आहे. तुम्ही त्याला अधिक जवळ करा. त्याला अभ्यासात मदत करा. अरे, एक मुलगा जर चांगला झाला तर केवढे मोठे कार्य झाल्या-सारखे होईल. अशा बाबतीत आपण आपल्यापासून विचार करावा आणि मग निर्णय घ्यावा.

आपल्यापासून विचार केला पाहिजे असं जे तुम्ही म्हणालात ते मला कळले नाही.

असं समज, त्या मुलाच्या ठिकाणी तू असतास आणि तुझ्यावर असा प्रसंग आला असता तर तू काय केलं असतंस ? इतर मुलं तुझ्याजवळ चांगली वागत नाहीत असं तुला कळलं असतं तर तुला काय वाटलं असतं ? पूर्वीचे ज्ञानी पुरुष न्यायनिवाडा कर-ताना स्वत: आपणच दोषी आहोत असं समजून सर्व परिस्थितीचा विचार करीत. त्यानंतर त्या सर्व प्रसंगाचा एक तिऱ्हाईत म्हणून विचार करीत आणि मग साकल्याने निवाडा करीत. तो निवाडा नेहमी बरोबर होत असे. आपण असा निर्णय करायला शिकलं पाहिजे. मोठे लोक नेहमी असं करतात. दुसऱ्याच्या दोषांवर पांघरूण घालून त्याला मोठं केलं की त्याबरोबर आपणही मोठे होतो. तुला विसोबा खेचरांची गोष्ट माहीत आहे ?

नाही. त्यांनी काय केलं ?

विसोबा खेचरांनी ज्ञानेश्वरांना आयुष्यभर छळले. ज्ञानेश्वरांची योग्यता त्यांना कळली नाही पण ज्ञानेश्वरांच्या पाठीवर मुक्ताईने मांडे भाजल्याचे त्यांनी पाहिले आणि पश्चात्तापाने ते रडू लागले.



म. सं. सं. ठाणें, ग्रंथालय
बाल वाङ्मय विभाग.
दिनांक ....
विषय ........

ज्ञानदेवांनी पुढे होऊन त्यांच्या पाठीवर हात फिरविला आणि म्हणाले– विसोबा, झालं गेलं सगळं विसरून जा. एकाच परमेश्वराची आपण लेकरे आहोत. आपणच एकमेकांचा द्वेष केला, एकमेकांशी भांडलो तर त्या परमेश्वराला दुःख होईल. तुम्ही पूर्वीचं सर्व विसरलात. आता तुम्ही मोठे व्हाल. ज्ञानदेवांचं म्हणणं पुढे खरं झालं.

विसोबा खेचर कसे काय मोठे झाले ?

ज्ञानदेवांसारख्या महापुरुषाने त्यांना एकदा आपले म्हटल्यामुळे त्यांच्यातला राग, द्वेष, मत्सर सर्व नाहीसा झाला. त्यामुळे त्यांना भगवंताने देखील मोठे म्हटले. पांडुरंगाचा भक्त नामदेव तुला माहीत आहेत. त्या नामदेवांचे हे गुरु झाले. त्याचं कारण कळलं तुला.

कारण ज्ञानदेवांनी त्याचे सर्व अपराध विसरून त्याला जवळ केलं. आपलं म्हटलं म्हणून.

अगदी बरोबर.

मी पण आता त्या मुलाबरोबर मैत्री करीन. त्याला अभ्यासात मदत करीन. त्याच्याबरोबर खेळेन. इतकेच नव्हे तर माझ्या इतर मित्रांनासुद्धा मी त्याच्याबरोबर प्रेमाने वागायला सांगेन.

असं केलंत तर तुमचा वर्ग आदर्श ठरेल. तुमच्या शाळेचं नाव मोठं होईल.

काका तुमच्या बोलण्यानं मला किती बरं वाटलं. काका या वेळापत्रकात आणखी एक घालायचं राहिलं.

काय घालायचं राहिलं.

काका तुम्ही मला रोज दैनंदिनी लिहावयास सांगितली आहे. अंथरूणावर पडण्यापूर्वी दैनंदिनी लिहिण्याचं ठरविलं आहे. असे

प्रसंग माझ्या दैनंदिनीत आवश्य लिहून ठेवले पाहिजेत.

म्हणजे दैनंदिनीचं महत्त्व कळलं तर तुला. आज रविवार मग आणखी काही बेत ?

बेत वगैरे काही नाही. पण आज मी सर्व पुस्तकांना कव्हरं घालणार आहे. संध्याकाळी बाबांच्याबरोबर वैज्ञानिक प्रदर्शन बघायला जाणार आहे. बाबा म्हणाले, असली प्रदर्शने कधीही चुकवू नयेत. त्याने आपल्या ज्ञानात भर पडते.

त्यांचं म्हणणं खरं आहे. तुझ्या वेळापत्रकात तू मुद्दाम असं नमूद करून ठेव की प्रत्येक रविवार म्हणजे शाळेशिवाय सामान्य ज्ञान मिळविण्याचा दिवस. मग त्या दिवशी एखादे पुस्तक वाच. प्रदर्शन पहा, चित्रपट पहा, मोठ्या व्यक्तीकडे जा, सहलीला जा. असं काहीतरी निराळं कर. रविवारी शाळेच्या अभ्यासाची थोडी गती मंद झाली तरी चालेल. हे ज्याप्रमाणे रविवारी करायचं म्हणून सांगितलं त्याप्रमाणे शाळेच्या मोठ्या सुट्यांचा देखील असाच चांगला उपयोग करून घ्यायचा.

मोठ्या सुट्यांमध्ये काय करता येईल ?

आता तू सायकल वापरतोस. तिची काही दुरुस्ती करावी लागली तर तू ती तुझ्या दुकानदाराकडे नेऊन टाकतोस. त्याला पैसेही बरेच द्यावे लागतात. अशी कारागीर माणसं आपल्या आज्ञानाचा फायदा घेतात आणि थोड्याशा कामासाठी बराच पैसा आपल्याकडून घेतात. त्यापेक्षा तू एका सुटीत सायकल दुरुस्ती शिकलास तर ?

माझी सायकल मलाच दुरुस्त करता येईल. त्यामुळें वेळ आणि पैसा दोहोंची बचत होईल.

पण अशासाठी प्रत्येक सुटीत काय करायचं याचा आराखडा

तयार करून त्याची माहितीही मिळवून ठेवावी लागते.

मग या वर्षी दिवाळीच्या सुटीत मी सायकल दुरुस्तीच शिकेन आणि मे महिन्याच्या सुटीत मात्र पोहणे, कराटे आणि क्रिकेट शिकायचं आत्ताच ठरवलं आहे.

*

# चार

ठरल्याप्रमाण रविवारी सकाळी माधव आला. अगदी खुषीत होता. खुर्चीवर बसत त्याने सांगितले आज मला तुमच्याकडे येता येते की नाही याबद्दल जरा शंकाच वाटत होती. कारण आमच्याकडे आज आमच्या बाबांच्या ओळखीचे एक पाहुणे आले आहेत. पुण्यातील काही प्रेक्षणीय स्थळे त्यांना दाखविण्याचे काम बाबांनी मला सांगितले. परंतु पुण्यास तशा प्रकारची एक बस आहे हे मी बाबांच्या लक्षात आणून दिलं. तेव्हा ते म्हणाले, ठीक आहे. तुला काकांकडे अभ्यासाला जायचं आहे ना– जा तू. पण लवकर ये हं. मागल्याच रविवारी तुम्ही मला पाहुण्याबद्दल सांगितलेत आणि आजच हे असे घडले. आपण पाहुण्यांना नाही म्हणालो तर आपल्याला दोष लागेल की काय ? असा विचारही मनात आला. परंतु पुणे-दर्शनच्या गाडीने माझा तो प्रश्न सुटला. मी तसाच निघालो आणि तुमच्याकडे आलो.

बरं झालं. या आठवड्यात काय नवीन शिकलास ?

काका आता शाळेचा अभ्यास अगदी व्यवस्थित चालू झाला.

तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी अभ्यासही करू लागलो. काका आमचे गणिताचे शिक्षण इतके कडक आहेत की काही विचारू नका. परवा त्यांनी भूमितीमधील काही व्याख्या पाठ करून यायला सांगितल्या होत्या. मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे पहाटेच पाठ करायला बसलो आणि आश्चर्य म्हणजे पंधरा मिनिटांतच माझ्या सर्व व्याख्या अगदी पाठ झाल्या. सकाळी लवकर पाठांतर फारच चांगले होते असं तुम्ही म्हणालात मला त्याचा फारच चांगला अनुभव आला.

अरे आम्ही देखील लहानपणी पहाटे उठूनच पाठ करीत असू. आमच्यावेळी आम्हाला संस्कृत शिकवत असत. संस्कृतमधील प्रत्येक धातू आणि शब्दांची विभक्तीरूपे पाठच करावी लागतात. त्याशिवाय त्यांचा चांगला उपयोग करता येत नाही.

मलाही संस्कृत आवडतं. पण आमच्या शाळेत संस्कृत शिकवतच नाहीत. आमचे बाबा म्हणत होते. संस्कृत ही सर्व भाषांची जननी आहे. ज्याला संस्कृत चांगलं येतं त्याला इतर भाषासुद्धा अतिशय लवकर आत्मसात करता येतात. आपले पूर्वीचे सर्व ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत ना ?

होय. आपले सर्व धार्मिक, वैज्ञानिक आणि वैद्यक वगैरे सर्वच ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. ते ग्रंथ वाचता यावेत असे वाटत असेल त्याला संस्कृताशिवाय तरणोपाय नाही. शिवाय संस्कृतामुळे आपली भाषासुद्धा कशी गोड होते. शब्दांचा संग्रह वाढतो. अचूक आणि सार्थ शब्द वापरण्याची सवय लागते आणि त्यामुळे लोकांना देखील आपलं बोलणं आवडतं.

आपले वेद, उपनिषदे हे सर्व संस्कृतमध्येच आहे नाही का ?

होय पण वेदांचे आणि उपनिषदांचे संस्कृत फार वरच्या दर्जाचे

आहे. त्यासाठी विशेष अभ्यास करावा लागतो.

मलाही वाटतं आपण देखील संस्कृत शिकावं.

थोडं थांब. तुलाही संस्कृत शिकता येईल. कारण तुमच्या शाळेत आता संस्कृत शिकविण्याची सोय करण्यात आली आहे. पण त्यासाठी पाठांतराची मेहनत घेण्याची तयारी तुला आत्ता-पासूनच करावी लागेल.

मी जरूर मेहनत करीन. काका परवा मी म्हटलं ना आमच्या गणिताच्या शिक्षकांनी आम्हाला भूमितीच्या काही व्याख्या पाठ करायला सांगितल्या होत्या. आमच्या वर्गातल्या एका मुलाने त्या मुळीच पाठ केल्या नाहीत. तेव्हा आमच्या शिक्षकांनी प्रत्येक व्याख्या पन्नास वेळा लिहून आणण्याची त्याला शिक्षा दिली. दुसऱ्या दिवशी गणिताच्या तासाला शिक्षकांनी विचारले, आणल्या का सगळ्या व्याख्या पन्नास पन्नास वेळा लिहून ?

तो मुलगा काहीच बोलेना. नुसत उभा होता.

पुन्हा ज्यावेळी शिक्षकांनी ह्याला रागावून विचारले तेव्हा तो म्हणाला नाही आणल्या लिहून ? पुन्हा शिक्षकांनी विचारलं मग पाठ केल्या ? तेव्हाही तो काही बोलला नाही. त्यांनी त्याला वर्गाच्या बाहेर जायला सांगितलं आणि ते पुढे म्हणाले, ज्या दिवशी व्याख्या लिहून आणशील त्या दिवशी माझ्या तासाला बसायचं, तोपर्यंत माझ्या वर्गात पाऊल ठेवायचं नाही. अखेर तो मुलगा बाहेर गेला. शिक्षकांनी त्याला अशी शिक्षा केली म्हणून आम्हालाही आमच्या शिक्षकांचा जरा रागच आला.

अरे, तुमचे शिक्षक फक्त त्याला बोलले आणि वर्गाच्या बाहेर काढलं. आमच्यावेळी असं काही झालं असतं तर आमच्या गुरु-जींनी आम्हाला छडीनं फोडून काढलं असतं.

अशा शिक्षा करणाऱ्या शिक्षकांना काय म्हणावं ? अगदी राक्षसासारखे मारतात. त्यांना लहान विद्यार्थ्यांची दया कशी येत नाही कुणास ठाऊक. आता बघाना त्या विद्यार्थ्याचे किती नुकसान होईल वर्गात बसायला न मिळाल्यामुळे.

तू म्हणतोस तसे नाही. आई-वडील आपल्या मुलावर जेवढे प्रेम करतात तितकंच प्रेम शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांवर करतात. आपलं काही चुकलं तर आई-वडील रागावतील की नाही? शिक्षा करतील की नाही ?

निश्चित करतील.

तसंच गुरुजींचं पण आहे. आई, वडील आणि गुरू यांना आपल्या मुलाचं अंतिम हित दिसत असतं. त्यांची नजर त्याच्या कल्याणाकडे असते. आणि ते कल्याण साधावे म्हणून त्यांचा फार मोठा प्रयत्न चालू असतो.

अंतिम हित म्हणजे काय ?

आपल्या मुलाला सर्व लोक चांगलं म्हणतात. तो सुखात राहतो. सर्वांशी चांगला वागतो असं त्याच्या मोठेपणचं चित्र त्यांच्या समोर असतं आणि ते चित्र चांगलं दिसावं, चांगलं व्हावं म्हणून ते फार मोठे परिश्रम करीत असतात.

आता शिक्षा करण्यात कसले आलेत परिश्रम.

तू म्हणतोस तसं नाही. मुलाला शिक्षा करताना आई-वडिलांना काय आनंद वाटतो ? आपल्या विद्यार्थ्याला गुरुजी काय आनंदाने शिक्षा करतात ? तु कधी कुंभारवाड्यात गेलास का ?

हो. गेलो होतो ना.

तुला माहीत नाही. कुंभार मातीचा माठ बनवतो. त्यावेळी माती ओली असते. तिचा ओलेपणा किंचित कमी झाला की त्याचा

आकार बरोबर झाला आहे की नाही हे तो पाहातो. तसा तो झाला नसेल तर हातात थापटणं घेवून तो त्याच्यावर मारत राहतो. एकदा त्याला मनासारखा आकार आला की मगच तो माठ बाजूला करतो. त्यानंतर त्या माठाला तो भट्टीत घालतो आणि भाजून काढतो. माठ एकदा भाजला म्हणजे मग त्याचा आकार कधीच बदलत नाही. लोक तो हौशेने घेतात. त्यातलं गार पाणी पिऊन आनंद व्यक्त करतात. तसाच ही शिक्षा म्हणजे एक संस्कारच आहे.

मला हे समजत नाही काका की अशी शिक्षा करून का विद्यार्थ्याच्या अंतिम हिताकडे लक्ष दिल्यासारखं होईल.

ऐक, तुला मी एक गोष्ट सांगतो. गोष्ट म्हटली की तुला अगदी बरं वाटलं असेल नाही.

गोष्ट काय सगळ्याच मुलांना आवडते.

एक मुलगा होता. त्याचे वडील लहानपणीच वारले. आईने त्याला वाढविला. घरची गरिबी. चार ठिकाणी मोलमजुरी करून ती आपला संसार चालवी. मुलाला शाळेत घातले. तो शाळेत जातो सांगून घरातून बाहेर पडे. कुठे तरी उनाडे. एकदा त्याने एका दुकानातून चुरमुरे चोरून आणले. आईला सांगितले मला एका मित्राने दिले. पुढे एकदा एका ठिकाणी पैसे चोरले. आईला सांगितले मला रस्त्यात सापडले. आईने लक्ष दिले नाही. पुढे तो मोठा झाला आणि मोठ्या चोऱ्या करू लागला. अशीच एक मोठी चोरी करताना एका माणसाला त्याने ठार मारले. पुढे त्याला कोर्टाने फाशीची दिली. फाशी जायच्या वेळी तेथील अधिकाऱ्याने त्याला विचारले तुझी शेवटची इच्छा काय आहे. तो म्हणाला मला माझ्या आईला एकदा कडकडून भेटायचं आहे. त्याच्या

इच्छेप्रमाणे त्याची आई त्याला भेटायला आली. आईला त्याने कडकडून मिठी मारली आणि त्याचवेळी तिचा कान चावून त्याचा तुकडा पाडला. आई ओरडली. त्या ठिकाणचे अधिकारी देखील त्याला ओरडले. आईला तेव्हा तो म्हणाला आई पहिल्या प्रथम मी चुरमुऱ्याची चोरी केली त्यावेळी जर तू मला शिक्षा केली असतीस तर आज मला फाशीची शिक्षा झाली नसती.

त्या मुलानं खरं तेच सांगितलं. त्यावेळी आईनं लक्ष दिलं असतं आणि या त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा केली असती तर तो मुलगा निश्चितच सुधारला असता.

आता तूच बघ. तू आता कोणाला दोषी ठरवलंस ?

ह्या मुलापेक्षा त्याची आईच जास्त दोषी आहे.

होय ना ? तसंच प्रत्येक मुलाच्या आई-बापांना आणि शिक्षकांना नेहमी असं वाटत असतं की आपला मुलगा चांगला निघाला नाही म्हणून आपल्याला कोणी दोष देता कामा नये. यावरून आणखी एक गोष्ट मला आठवली.

काका तुमच्या गोष्टी बरंच काही शिकवतात. सांगा, कसली गोष्ट.

तुझ्यासारखा एक मुलगा होता. खूप हुशार होता. एकदा काय झालं त्याचं पोट सारखं दुखू लागलं. औषध वगैरे झालं. पण त्याचं पोट काही दुखायचं थांबेना. त्या मुलाचे एक काका प्रख्यात सर्जन होते. काकांचं या मुलावर अतिशय प्रेम होतं. कारण काकांना मुलगा नव्हता. त्या मुलाच्या आई-वडिलांनी त्याला काकांकडे नेले. काकांनी त्याला तपासलं आणि सांगितलं या मुलाच्या पोटात फार मोठा रोग निर्माण झाला आहे. तो औषधाने बरा होण्यासारखा नाही. त्याच्यावर शस्त्रक्रियाच करावी लागेल. वडिलांनी

ते ऐकलं आणि ते आपल्या भावाला म्हणाले, हे बघ, यातलं मला काही कळत नाही. पुतण्या तुझाच आहे. तुझं त्याच्यावर प्रेम आहे. तेव्हा तूच ही शस्त्रक्रिया कर.

मी ? मुलाचे काका म्हणाले. छे ! छें !! मला नाही ते जमणार. माझं त्याच्यावर जिवापाड प्रेम आहे. त्याला शस्त्र लावणं मला सहनच होत नाही.

असं कसं म्हणतोस. मुलाचे वडील त्याला सांगत होते. तू जर ही शस्त्रक्रिया केली नाहीस तर मुलाचं काय होईल.

ते सर्व खरं आहे, पण ही शस्त्रक्रिया मला मुळीच करता येणार नाही.

मग मी काय करावं ?

नुसती शस्त्रक्रिया करायची हे ऐकूनच मला कसेतरी वाटू लागले आहे.

मुलाच्या वडिलांनी त्याला परोपरीने विनविले. पण त्याचे काका काही तयार होईनात. अखेर वडिलांनी त्याला दुसऱ्या डॉक्टरकडे नेला. त्याने पाहिले. पोटातील रोगाने मुलगा ओरडत होता. त्याला चैन पडत नव्हते. अखेर डॉक्टरांनी तावडतोब शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आणि लगेच शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टर बाहेर आले. त्यांनी सांगितलं आता मुलाला काहीही धोका नाही. तो आता पूर्ण बरा होईल. मुलाच्या वडिलांना आनंद झाला. त्या डॉक्टरांचे त्यांनी आभार मानले आणि डॉक्टर भावाच्या कृत्याबद्दल त्याला नावे ठेविली. आता तूच सांग. ज्याने जखम करायची नाकारली त्याला नावे ठेविली आणि ज्यांनी त्या मुलाचे पोट फाडले त्याचा गौरव केला. यात कोण चुकले आणि

कोण बरोबर.

ज्यांनी त्या मुलाचे पोट फाडून दोष नाहीसा केला ते डॉक्टर खरोखरीच चांगले.

अरे, पण त्यांनी तर मुलाला जखम केली. तरी देखील ते चांगले ?

त्यांनी जर जखम केली नसती तर त्या मुलाचा रोग वाढला असता. त्या मुलाचा जीवच धोक्यात आला असता. त्याच्या कल्याणासाठीच तर डॉक्टरांनी त्याला जखम केली. त्यात त्या डॉक्टरांचा हेतू हा मुलगा पूर्ण बरा व्हावा, चांगला व्हावा असाच होता. म्हणून मी म्हटलं शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर चांगले आणि मुलावर दया-प्रेम करणारे त्याचे काका मुलाचे कल्याण न समजणारे.

बरोबर सांगितलंस. म्हणूनच मी मगाशी म्हटलं तुमच्या गणिताच्या शिक्षकांनी त्या मुलाला जी शिक्षा केली ती त्याचे कायमचे कल्याण व्हावे म्हणून. तू मुद्दाम कधीतरी त्या शिक्षकांना भेटून विचार, मी म्हणतो ते खरं की खोटं ते.

गुरु ज्यावेळी अशी शिक्षा करतात त्यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरुजींचा राग न धरता प्रथम आपण आपले परीक्षण करावे. आपले काय चुकले ते आपण स्वतःच शोधून काढावे. एकदा आपली चूक आपल्या लक्षात आली की ती चूक दुरुस्त करण्याचे मार्ग आपल्याला ताबडतोब मिळतात. आपली चूक आपण जाणत्या माणसाजवळ कबूल केली तर त्या माणसाला देखील आपल्याबद्दल आदर वाटतो. अशी चूक होवू नये म्हणून तो देखील आपण होवून मार्गदर्शन करील. मघाशी सांगितलं तशी लहान मुलं म्हणजे ओल्या मातीचे नुसते गोळे असतात. त्या

गोळ्याला आकार द्यावा लागतो आणि हा आकार देताना त्या ओल्या मातीवर अत्यंत सावधपणे संस्कार करावे लागतात.

मघाशी पण तुम्ही म्हणालात आणि आत्ताही पुन्हा म्हणालात संस्कार करावे लागतात, पण संस्कार म्हणजे काय ?

चांगला प्रश्न विचारलास. संस्कार हा संस्कृत शब्द आहे. 'सं' याचा अर्थ चांगला. 'कार' हा कृ म्हणजे करणे या मूळ धातू-पासून तयार झालेला शब्द. ज्या क्रियेतून किंवा कृतीतून सर्वांच्या मताने चांगला परिणाम ठरेल त्याला संस्कार म्हणतात. मनुष्य चांगला व्हावा असे वाटत असेल तर त्याच्या जन्मापूर्वीपासूनच त्याच्यावर चांगले संस्कार करावे लागतात. जन्माच्या अगोदर आणि जन्मानंतर केलेले संस्कार कायमचे टिकतात. मनुष्याला ते नेहमी चांगलं बनवतात.

मनुष्य संस्काराने चांगला होतो पण काही वेळा असं दिसून येतं की, एखाद्या चांगल्या आई-वडिलांचा मुलगा अगदी वाईट निघतो. खरं तर आई-बाप त्याच्यावर संस्कार करायला विसरले असं तर होत नाही.

मुळीच नाही. प्रत्येक मुलावर त्याचे आई-बाप चांगले संस्कार करीत असतात. आपला मुलगा वाईट निघावा, लोकांनी त्याचं नावसुद्धा घेऊ नये, असं कोणातरी आई-बापांना वाटेल का?

नाही. सर्वच आई-वडिलांना आपला मुलगा मोठा व्हावा, आपले आपल्या कुटुंबाचे नाव काढणारा, सर्वांनी कौतुक करावं असाच आपला मुलगा असावा असं नेहमी वाटतं. त्यामुळंच तर आई-बाप आपल्या मुलाची भरपूर काळजी घेतात. असं असूनसुद्धा काही मुलं वाईट निघतात त्याचं काय ? आता छत्रपती शिवाजी महाराज केवढे मोठे होते ? त्यांचं नुसतं नाव काढलं तरी आपोआप

हात जोडले जातात. त्यांचा मुलगा संभाजी. आपल्या देशाच्या शत्रूंना जावून मिळाला. व्यसनी झाला. हे कसं काय ?

तुझी शंका अगदी बरोबर आहे. या गोष्टीचा थोडा विचार केला म्हणजे याचं उत्तर आपणास व्यवस्थित रीतीनं मिळतं. संभाजीवर शिवाजीचे संस्कार होते, त्यामुळे तो शूर आणि धर्मनिष्ठ होता. परंतु त्याला जी संगत मिळाली ती मात्र अतिशय वाईट होती. कलुषा कबजीसारख्या व्यसनी माणसाला त्याने आपले मित्र मानले तेव्हा तो व्यसनी झाला. ह्या व्यसनामुळेच तो पकडला गेला. पण मरताना मात्र त्याच्या ही गोष्ट लक्षात आली की, आपण व्यसनी लोकांच्या मैत्रीमुळे व्यसनी झालो. त्यामुळे आपला सर्वनाश होण्याची वेळ आली. शेवटी त्याला आपला धर्म आणि वडिलांच्या संस्काराचे स्मरण झाले. त्याने मरताना वाटेल तेवढे हाल सहन केले पण आपला धर्माभिमान सोडला नाही. धर्मवीर म्हणून त्याने जगाचा निरोप घेतला.

संभाजीला धर्मवीर म्हणतात. आम्ही या सुटीत संभाजी महाराजांच्या समाधीच्या दर्शनाला गेलो होतो. त्या ठिकाणी एक म्हातारा गृहस्थ होता. त्याने आम्हाला संभाजी महाराजांच्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या. शेवटी उठता उठता तो म्हणाला माती कधी आपला धर्म विसरत नाही. तो असं का म्हणाला ते मात्र त्याला विचारायचं राहून गेलं कारण तेवढ्यात आमची बस आली आणि आम्ही निघालो. पण तो म्हातारा असं का म्हणाला? त्याचा अर्थ काय ?

त्याचा अर्थ असा आहे, संस्कारानं मनुष्य कधी बिघडत नाही. मनुष्य बिघडतो तो त्याला मिळणाऱ्या संगतीनं. संगत वाईट लागली की, मनुष्य वाईट होतो. तुला एक उदाहरण सांगतो. एक

लोखंडाची जाड पट्टी घेतली. लोहाराच्या भात्यामुळे तप्त झालेल्या भट्टीत ती अगदी लालेलाल केली. त्याचप्रमाणे पाणी घेऊन ते पण खूप खूप तापवलं. असं समज की त्या तापलेल्या लोखंडाच्या पट्टीचं तपमान आणि उकळत्या पाण्याचं तपमान अगदी सारखं झालं. असं झाल्यानंतर ते उकळतं पाणी त्या लालेलाल झालेल्या लोखंडाच्या पट्टीवर ओतलं तर काय होईल. तापलेली पट्टी आणि उकळतं पाणी यांच्यामुळं अधिक उष्णता निर्माण होईल की त्या पट्टीचं उष्णतामान कमी होईल. इतकेच नव्हे, ज्या अग्नीने ती पट्टी तांबडीलाल केली आणि पाण्याला उकळी येईपर्यंत तापविलं त्या अग्नीवर जर हे उकळते पाणी ओतले तर तो अग्नी अधिक भडकेल की विझून जाईल ?

त्या उकळत्या पाण्यानं तापलेल्या पट्टीचं तपमान वाढणार नाही. उलट कमी होईल आणि अग्नि तर विझूनच जाईल.

याचं कारण काय तुझ्या लक्षात आलं ?

नाही. का बरं असं झालं.

पाण्यावर मूळचे जे संस्कार आहेत ते थंडपणाचे आहेत. अग्नीच्या संगतीनं ते पाणी बिघडलं. अग्निप्रमाणे तप्त झालं. परंतु अग्नीवर ज्यावेळी ते ओतलं तेव्हा पाणी आपला संस्कार विसरलं नाही. त्यांनी प्रज्वलित झालेला अग्नि थंड केला. त्यामुळे मूळचे संस्कार कधी नाहीसे होत नाहीत. आणिबाणीच्या वेळी प्रत्येकाचे मूळचे संस्कार जागृत होतात आणि त्याच्या हातून त्या संस्काराप्रमाणेच कृती घडते. संगतीचा परिणाम काही काळ मोठा वाटतो पण तो अखेरपर्यंत टिकत नाही. तो नाहीसा होऊन प्रत्येक वस्तू मूळच्या संस्कारावर येते.

काका, मनुष्यावर चांगले संस्कार केल्यावर मनुष्य मुळीच

बिघडणार नाहीं. हे संस्कार केव्हापासून करतात.

मनुष्य मातेच्या गर्भात असल्यापासून किंवा त्या पूर्वीपासूनही त्याच्यावर संस्कार करावेत अशी आपली संस्कृती आहे. मूल जितकं लहान तितके त्यावर झालेले संस्कार अधिक मजबूत होतात.

तसं पाहिलं तर मूल गर्भातच लहान असतं. मग त्याच्यावर कसे आणि कुणी संस्कार करायचे. प्रथम आईनं आपल्या मनावर संस्कार करून त्याला मोठं बनवायचं की, त्या गर्भातील मुलावर त्याचे आपोआप संस्कार होतात. ह्याचं एखादं उदाहरण आहे का ?

अरे एक का, अशी अनेक उदाहरणे आहेत.

मग मला सांगा ना एखादी गोष्ट.

सांगतो. गोष्ट भारतातील आहे.

म्हणजे महाभारतातील ना ?

होय. महाभारतालाच भारत असे छोटेखानी नाव आहे. त्यातली ही गोष्ट आहे. अर्जुनाची पत्नी सुभद्रा. ही श्रीकृष्णाची बहीण. ती गरोदर असताना श्रीकृष्ण तिला द्वारकेला घेऊन जात होते. आता एवढा मोठा लांबचा मार्ग. रथ चालू होता. पण वेळ जावा म्हणून तिने कृष्णाला काहीतरी सांगण्याची विनंती केली. तेव्हा तो म्हणाला, काय सांगू तुला ?

काय सांगशील. पराक्रमी पुरुषांच्या कथा सांग. सुभद्रा.

पराक्रमी पुरुषांच्या कथा ? श्रीकृष्ण.

हो. पण त्यापेक्षा मी म्हणते तुला चक्रव्यूहाचं ज्ञान आहे. मला सांग ना तो चक्रव्यूह म्हणजे काय. चक्रव्यूहात युद्ध कसं करायचं?

ठीक आहे. सांगतो एक. असं म्हणून श्रीकृष्ण सांगू लागले.

सुभद्रा ऐकत होती. रथ चालला होता. गार वाऱ्यामुळे तिला झोप लागली. सुभद्रा जोपर्यंत जागी होती. तोपर्यंत ती कृष्णाच्या सांगण्याला हुंकार देत होती. झोप लागल्यावर तिच्या उदरातील बाळाने हुंकार द्यायला सुरुवात केली. ज्या वेळी श्रीकृष्णाच्या हे लक्षात आले तेव्हा चक्रव्यूहात कसे जायचे तेवढेच सांगून झाले. कृष्णाने आपले बोलणे थांबविले. चक्रव्यूहात कसे जायचे याचे ज्ञान मात्र त्या बाळाला झाले. परत कसे यायचे हे ज्ञान मात्र त्याला मिळाले नाही. त्यामुळे तुला माहीत असेल की अभिमन्यु केवळ सोळाव्या वर्षी आपल्या पराक्रमाने चक्रव्यूहात गेला परंतु परत येण्याचे ज्ञान त्याला नसल्याने त्याला युद्धातच मरण पत्करावे लागले. हा सर्व परिणाम कशाचा ?

अभिमन्यूवर झालेल्या संस्काराचा ?

बरोबर. असे संस्कार काय चमत्कार करू शकतात ते जर तुला समजावून घ्यायचे असेल. तर स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, ज्ञानेश्वर महाराज, यांची चरित्रे मुद्दाम वाच. त्यांतून तुला बरेच काही मिळेल.

सर्वच मोठ्या माणसांच्या बाबतीत त्यांच्या बालपणी त्यांच्यावर चांगले संस्कार झाले असतील नाही ?

तू छत्रपती शिवाजी महाराजांचं चरित्र वाचलं आहेस? महाराज लहान असताना त्यांची आई जिजामाता त्यांना रामायण आणि महाभारताच्या श्रेष्ठ पुरुषांच्या कथा सांगायची. त्याचा परिणाम काय झाला ! शिवाजी महाराजांच्या बालमनावर पराक्रम, राष्ट्रप्रेम, अन्यायाविरुद्ध चीड, संत-सज्जनांबद्दल आदर असे चांगले संस्कार झाले, त्या संस्कारांमुळे ते स्वतः मोठे झाले आणि आपलं



नाव त्यांनी अजरामर केलं.

आपल्याकडे सुद्धा शाळेत काय किंवा घरी काय चांगले संस्कार करणारी पुस्तके लहान मुलांकडून वाचून घेतली पाहिजेत. मला आठवतं की, आमची मोठी आई रोज पुराणाला जात असे. ती आली की रात्री आम्हाला गोष्टी सांगत असे. त्या गोष्टी ऐकताना आम्हाला खूप आनंद वाटत असे. पण आता त्या गोष्टींची जेव्हा आठवण होते तेव्हा प्रत्येक गोष्टीत काय रहस्य आहे ते आता लक्षात येते.

यासाठीच मी म्हटलं, आपल्याकडे फार मोठमोठे पुरुष होऊन गेले आहेत. त्यांची चरित्रे नियमित वाचावीत. त्यांच्यावर कसे संस्कार आणि कोणत्या वयात केले गेले याचा विचार करावा. इतकेच नव्हे, तर यातून आपल्याला काय घेता येईल ते घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा आपला प्रयत्न सतत राहिला पाहिजे.

पूर्वी मी अशी चरित्रें केवळ गंमत म्हणून वाचत असे. पण काका, आता मात्र मला अशी चरित्रे कशी वाचावीत ते नव्याने कळले. आता पूर्वी वाचलेली सर्व चरित्रे मी आता पुन्हा वाचीन.

जरूर, जरूर. अशाने तुझ्या ज्ञानात चांगलीच भर पडेल आणि केव्हा कसे वागावे ते पण कळेल.

माझे बोलणे संपताच माधव उठला. येतो मी काका म्हणून दाराकडे वळला. पण त्याला काय वाटले ते तो पुन्हा माझ्याकडे वळून म्हणाला– काका, आपल्या बोलण्याच्या भरात मी तुम्हाला निरोप सांगायचाच विसरलो.

कसला निरोप ?

पुढच्या रविवारी तुम्हाला बाबांनी जेवायला बोलावलं आहे.

जेवायला ?

हो काका. तुम्हाला जेवायला यायलाच पाहिजे. तुम्ही आलात म्हणजे आम्हाला खरंच खूप आनंद वाटतो. मग येणार ना ?

हो, येईन. अकरा वाजेपर्यंत येतो, बाबांना सांग.

हो हो, म्हणून माधव अगदी आनंदाने बाहेर पडला.

*

# पाच

ठरल्याप्रमाणे मी अकरा वाजता माधवच्या घरी पोहोचलो. माधवचे वडील माझी वाट पाहात होते।

नमस्कार बाबासाहेब, मी म्हणालो.

नमस्कार. या–

उशीर तर नाही झाला ?

मुळीच नाही. आज रविवार. रोजच्यासारखी ऑफिसची घाई नाही. म्हणून म्हटलं तुम्हाला बोलवावं. बरेच दिवस झाले, तुम्ही आला नाहीत. आणि भेटही नाही. परवा माधवची शाळा सुरू झाल्यापासून दर रविवारी तो तुमच्याकडे जातो. पूर्वी कधी तुमच्याकडे जा म्हटलं तरी अळम-टळम करायचा. पण आता रविवार कधी येतो याची तो अगदी चातकासारखी वाट पहात असतो.

मागच्या चार रविवारी तो आला हे खरं आहे.

तो तुमच्याकडून आला की अगदी खुशीत असतो. संध्याकाळी सांगत असतो तुमच्याकडे काय गप्पा मारल्या. तुम्ही त्याला काय

सांगितलंत. पण काही म्हणा, तुमच्याकडून आल्यापासून त्याचं काम कसं अगदी घड्याळाच्या काटयाप्रमाणे चालू असते.

वा ! उत्तम. पण माधव कुठे दिसत नाही.

आहे ना. तुम्ही जेवायला येणार म्हणून तो आत आईला मदत करीत असेल. थांबा, हाक मारतो.

नको ! नको !! त्याचं काम चालू दे.

नाही. प्रत्येक रविवारी तो आईला कामात नेहमी मदत करीत असतो. त्यानं आईला तसं सांगून ठेवलं आहे. पुढच्या रविवारी काय काम करायचं ते आजच ठरतं. त्याप्रमाणे तो आपला कार्यक्रम आखतो.

वा ! छान !

आमचे संभाषण चालू असतानाच माधव आला. काका, नमस्कार असं म्हणत मला नमस्कार केला आणि म्हणाला– बाबा, जेवणाचं सर्व तयार झालं. पान घेतली. तुम्ही सांगितलंत की वाढते म्हणाली आई.

वाढा म्हणावं. बाबांनी माधवला सांगितलं. माधव घरात निघून गेला. चला, पाय धुवून घ्या. उगाच उशीर कशाला.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी उठलो, हातपाय धुतले आणि त्यांच्या स्वयंपाकघरात आलो. सर्वांची पानं खालीच घेतली होती. बसायला पाट, ताटापुढं रांगोळी. एका कोपऱ्यात उदबत्ती. हे सर्व पाहून मला आनंद वाटला. समोरच दत्तात्रयांचा एक सुबक फोटो होता. त्याला हार वगैरे घालून पूजा केली होती. मी त्या फोटोला नमस्कार केला.

बसा. काका. बाबासाहेब म्हणाले– पहिल्या पानावर.

त्यांच्या आदेशाप्रमाणे मी पहिल्या पानावर बसलो. शेजारी

बाबासाहेब आणि पलीकडे माधव. माधवची आई पानं वाढत होती. पाने वाढून झाली. बसा, बाबासाहेब म्हणाले.

आम्ही सर्वांनी प्रार्थना म्हटली. मी नेहमीप्रमाणे चित्राहुती वगैरे घातल्या. प्राणाहुती घेतल्या आणि जेवायला प्रारंभ केला. मी काय करतो याकडे माधवचे बारीक लक्ष होते. जेवता जेवता मला त्याने विचारले.

काका, आपण जेवणापूर्वी प्रार्थना म्हटल्यावर तुम्ही हे बारीक घास का काढून ठेवलेत ?

यांना चित्राहुती म्हणतात. भारतीय संस्कृतीचे जे अनेक आदर्श आहेत. त्या आदर्शाप्रमाणे हा एक उत्तम आचार आहे.

भारतीय संस्कृती. मी नाव ऐकतो. परंतु संस्कृती म्हणजे काय तेच मला माहीत नाही.

ते मी तुला नंतर सांगतो.

पण चित्राहुती का घालतात ते तर सांगाना.

मागे तुला मी सांगितलेले आठवते का नचिकेतची गोष्ट.

हो. चांगली आठवते.

नचिकेत हा अतिथी होता. अतिथीला अन्नपाणी दिल्याशिवाय घरातल्या माणसांनी जेवू नये असा भारतीय आदर्श आहे. त्याप्रमाणे आपण जेवण्यापूर्वी सर्व प्राणिमात्रांना अन्न द्यावे आणि मग आपण जेवावे असा एक पूर्वीचा नियम आहे. त्याप्रमाणे त्यांच्यासाठी हे चार घास काढून ठेवले आहेत.

पण हे घास तर खरकट्यात जातील.

बरोबर आहे. हे खरकटे सांडपाण्याबरोबर वाहात जाते. त्या पाण्यात अनेक जीवजन्तू असतात. फार कशाला बदके, कावळे वगैरे प्राणी हे अन्न भक्षण करतात. तुम्हाला जर सांगितलं की

त्या प्राण्यांना काही अन्न घाला तर आपण ऐकणार नाही. जगाचा हा एक नियम आहे. एकाने जे टाकलेले असते ते दुसऱ्याच्या उपयोगाचे असते.

ते कसे काय ?

असे बघ. ही झाडें आपली फळे टाकून देतात ती आपण अन्न म्हणून खातो. आपण नको असलेला कर्बद्विलप्राणील वायू बाहेर टाकतो तर झाडांना तो हवा असतो. झाडे प्राणवायू टाकतात तो आपल्याला हवा असतो. हा विश्वाचा नियम आहे. त्याप्रमाणे मी ह्या चित्राहुती घातल्या आणि प्रार्थना केली. माझ्या या टाकलेल्या अन्नाचा उपयोग दुसऱ्या प्राण्यांना अन्न म्हणून होवो.

हे प्राणी गटारात वगैरे वावरतात. त्या ठिकाणचे किडे वगैरे खातात आणि घाण नाहीशी करतात. हा त्यांचा आपल्यावर उपकारच आहे नाही का. मग त्यांचे उपकार अशा तऱ्हेने मानणे जरूर आहे.

काकासाहेब, आपण आपल्या प्रार्थनेनंतर आपल्याच पानाचा नैवेद्य दाखवलात आणि नमस्कार करून मग जेवायला प्रारंभ केलात. मला जरा विशेष वाटलं म्हणून विचारलं– बाबासाहेब म्हणाले.

बाबासाहेब, खरंच चांगला प्रश्न विचारलात. मी तुमच्याबरोबर देवाची प्रार्थना केली. त्यानंतर देवाला नैवेद्य समर्पण केला. प्रार्थना केली, भगवंता, हा अन्नाचा नैवेद्य तुला समर्पण केला आहे. मी आता तो तुझा प्रसाद म्हणून खातो.

प्रसाद म्हणून खाण्यात काही विशेष असतं का ?

हो बरंच काही असतं. देवाचा प्रसाद मग तो कसाही आणि केवढाही असला तरी त्याचा त्याग करायचा नाही. त्याला नावं

ठेवायची नाहीत असा आपला प्रघात आहे नाही का ?

होय.

मी तेच करतो आणि असेच करावे म्हणून सर्वांना सांगतो. समोरच्या जेवणाला आपण प्रसाद म्हणून संबोधिले की त्यातील पदार्थात मीठ कमी झाले, तिखट जास्त झाले वगैरे चर्चेला मग वावच उरत नाही. त्यामुळे जेवणारा आणि जेवण करणारी किंवा वाढणारी दोघंही खूष असतात. जेवणामुळे घरात होणारे वादच संपतात.

किती चांगला उपाय आहे हा– माधवची आई म्हणाली.

पण हा अंमलात आणला पाहिजे ना ?

बरं ! काकासाहेब पोळी वाढते.

नको वहिनी. मुळीच नको. पोट भरलं. आग्रह मुळीच नको. जेवणात मी मुळीच लाजणार नाही. आम्ही आमच्याकडे आणि आम्ही जे विविध कार्यक्रम करतो त्या वेळी जेवणाचे म्हणून काही नियम केले आहेत. त्यामध्ये महत्त्वाची तीन पथ्ये प्रत्येकानी सांभाळायची.

पथ्य ? ती कोणती ?

ती पथ्ये सोपी आहेत–

प्रत्येकाने पोटभर जेवायचे

पानात काहीही टाकायचे नाही.

आग्रह कोणालाही केला जाणार नाही.

दा. क्र
विषय

ही पथ्ये खरोखरीच चांगली आहेत. पण काकासाहेब एखाद्या माणसाने जेवायला बसल्यावर संकोचाने काही मागितले नाही किंवा वाढत असतानासुद्धा नको म्हटले तर काय करणार ?

वहिनी, पोटात भूक असताना आणि वाढणारा वाढीत असताना

नको म्हणण्यात जेवणाराच दोषी होतो. तुम्हाला ज्ञानेश्वरी माहीत आहे. त्या ज्ञानेश्वरीत याबद्दल ज्ञानेश्वरांनी फार चांगलं लिहिलं आहे.

काय म्हणतात ज्ञानेश्वर महाराज—

आत्ताच्या सारखा अगदी जेवणाचाच प्रसंग आहे.

वाढतिया पुढें भुकेला । उपरोधें म्हणे मी धाला ।
तैं तोचि पीडे आपुला । आणि दोषुहीं तया ।।

वाढणाऱ्यापुढे पोटात भूक असताना जेवणारा जर म्हणाला की, नको नको.माझं पोट भरलं आहे.तर भुकेमुळे त्याला शारीरिक त्रास होतो आणि खोटे बोलल्याचा दोष लागतो.

असा दोष कोणालाही लागू नये म्हणून आम्ही आता सांगितले असे नियम केले आणि त्यापुढे म्हणजे आम्ही ते प्रत्यक्ष अंमलात देखील आणतो. तुम्हाला माहीत नाही वहिनी, आग्रहामुळे किती तोटा होतो आणि आमच्या पथ्यामुळं केवढा फायदा होतो. आता आपण लग्नाच्या समारंभात पुष्कळवेळा जेवायला जातो. तिथं आग्रह किती करतात. अखेर माणसांना खावत नाही आणि अन्न पानात टाकावं लागतं. पुढे ते उष्टं अन्न सर्व एकत्र करायचं आणि भिकाऱ्यांना द्यायचं.

खरंच आहे तुमचं म्हणणं. यामुळं अन्न किती फुकट जातं. काही गणतीच नाही.

मी म्हणतो असं उष्ट अन्न भिकाऱ्यांना देण्यापेक्षा चांगले अन्न द्या ना. अहो ती देखील माणसेच आहेत. मी आता जे नियम सांगितले ना त्यामुळं प्रत्येकाला जेवढं पाहिजे तेवढंच तो घेतो. पानात टाकत नाही. त्यामुळं अन्न कधी वाया जात नाही.

बरोबर आहे. या महागाईच्या दिवसांत सर्वांनीच असं केलं

पाहिजे.

त्या आग्रहामुळं आणखी एक नुकसान होतं !

ते कोणतं ?

जेवण जास्त झालं म्हणजे जेवणाचा आनंद उपभोगता येत नाही. आळस निर्माण होतो. अपचन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या आग्रही जेवणाचा वीट येतो. शिवाय जेवणावर होणारा खर्च काय कमी होतो. तो होतोच. मग त्यापेक्षा अशा प्रकारे चार पैसे कमी खर्च होऊन वाचले तर त्याचा उपयोग दुसऱ्या एखाद्या चांगल्या कारणासाठी नाही का करता येणार ?

अलीकडे असा कोणी विचारच करीत नाही.

वहिनी अन्न हे दुधारी शस्त्र आहे. प्रमाणात खाल्लं तर आपलं पोषण करतं आणि अति झालं तर हेच अन्न माणसाच्या मृत्यूलाही कारणीभूत होतं.

अन्न हे ब्रह्म आहे. त्याचा योग्य तो आदर ठेवला नाही तर अन्न शाप देतं असं आमची आजी आम्हाला सांगत असे.

तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे वहिनी. आपल्या संस्कृतीनं प्रत्येक बाबतीत किती चांगले आदर्श निर्माण केलेत.

काका– माधव म्हणाला, जेवण झाल्यावर तुम्ही मला सांगणार आहात– संस्कृतीबद्दल. लक्षात आहे ना.

काकासाहेब, मलाही ऐकायचंय. तुमची जेवणं झाली की, मी पण येते जेवण करून. वहिनी आज तुम्ही काकांना काही विश्रांती वगैरे घेवू द्यायची नाही असंच ठरलेलं दिसतंय– बाबा तसं काही नाही बाबासाहेब. कोणाचं भलं होत असेल तर मला त्यात आनंदच

येईल अशी कोणतीही गोष्ट त्याच्या हातून घडू नये.

हे सर्व तुम्ही कशावरून ठरवलंत ?

कशावरून म्हणजे ? आमच्यासमोर अशा वेड्यावाकड्या मार्गानी जाणारी अनेक मुले आहेत. ती मोठी झाल्यावर आज त्यांचे जीवन कसे उद्ध्वस्त झाले आहे ते पाहतो ना ? तुम्हाला सांगते, काही मुलांनी तर आत्महत्येचासुद्धा प्रयत्न केलेला आम्ही पाहिला आहे.

म्हणजे तुम्ही दुसऱ्याचे पाहून अनुभवाने शहाण्या झालात. आता तुमचा हा अनुभव बोलतो आहे. होय ना ?

होय. आज इतक्या वर्षांच्या अनुभवानेच मी हे सांगते.

तुम्ही हे सांगताना मुलाचं कल्याण काय ते पण सांगितलंत.

हो. अशी चांगली मुलं आम्ही पाहिली आहेत.

ही देखील तुमच्या अनुभवाचीच शिदोरी आहे. आपला मुलगा नीट वागत नाही म्हणून तुमची एखादी मैत्रीण तुम्हाला सांगू लागली तर तुम्ही तिला तुमच्या अनुभवाचे बोल ऐकवाल आणि सांगाल, मी सांगते त्याप्रमाणे तुमच्या मुलाला करायला सांगा.

हो. मैत्रिणीच्या मुलाचं चांगलं व्हावं असं कोणाला वाटणार नाही ?

बरोबर आहे. पूर्वीच्या ऋषींनी अशा तऱ्हेचे अनेक अनुभव गाठी बांधले होते. इतकेच नव्हे तर आपला अनुभव दुसऱ्या ऋषींच्या अनुभवाशी पडताळून पाहिला होता. त्यावर चर्चा केली होती. स्वत: त्याप्रमाणे आचार केला होता. त्या आचाराचा परिणाम अनेकांना ज्यावेळी चांगला आला तेव्हा तो आचार सर्वमान्य झाला. असे एक-दोन नव्हे, हजारो आचार त्यांनी एकत्र करून त्याचं एक शास्त्र बनवलं. ह्या आचाराची परंपरा नदीच्या प्रवाहा-

सारखी पुढे पुढे सरकत राहिली आणि खरं सांगायचं तर याच आचार प्रवाहाला अनुरूप असं नाव दिलं. ते नाव म्हणजे 'संस्कृती'. ह्या संस्कृतीचा जन्म भारतात झाला म्हणून याला भारतीय संस्कृती असे म्हणतात.

मग इतर देशात काय आहे– माधव.

इतर देशांमध्ये देखील असे विद्वान लोक होऊन गेले. त्यांनी त्यांच्या राष्ट्रातील भोगोलिक परिस्थिती, आर्थिक स्थिती आणि राष्ट्रावर होणारे संभाव्य परिणाम यांचा विचार करून त्यांनी देखील काही नियम आणि आचार निर्माण केले. पाश्चात्य संस्कृती या एका मोठ्या नावाखाली अन्य अनेक संस्कृतींचा समावेश आहे.

अशा आणखी कोणत्या संस्कृती आहेत.

भारताची संस्कृती सर्वांत प्राचीन आहे. त्याप्रमाणे ग्रीक, रोमन, बॅबिलोयिन वगैरे संस्कृतींची नावे आपल्या कानांवर नेहमी येतात. प्रत्येक संस्कृतीत फरक आहे.

भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य संस्कृती यामध्ये ठळक असा फरक दिसतो का?

आहे ना. अगदी चांगल्या शब्दात सांगायचं तर पाश्चात्य संस्कृती भोगप्रवण आणि भारतीय संस्कृती त्याग-प्रवण आहे.

मला हे कळले नाही.

इंग्लंड, अमेरिकेत काय आहे, मुलगा मोठा झाला, त्याचं लग्न झालं की तो आपल्या आई-वडिलांपासून निराळा होतो. आपल्या वडिलांसाठी आपले काही कर्तव्य आहे, याची फारशी दखल तो घेत नाही. परंतु भारतीय संस्कृतीमध्ये ही दखल आई-बाप जिवंत असेपर्यंत तर घेतलीच जाते पण त्यानंतरही त्यांच्यासाठी पुत्राने काय करावे याचे आचार-नियम केले आहेत. आपल्याकडे लग्न हा

वाटेल. विश्रांती काय रोजचीच आहे. एखाद्या रविवारी तिला सुट्टी दिली म्हणून कुठे बिघडतं.

बोलण्याच्या ओघात जेवणे केव्हा झाली ते कळलेच नाही. आम्ही हात धुवून बाहेरच्या खोलीत आलो आणि एकेका खुर्चीवर स्थानापन्न झालो. थोड्याच वेळात माधव आणि माधवची आई देखील आमच्यात सामील झाल्या. खुर्चीवर बसत त्या म्हणाल्या आज तुम्ही आलात, आम्हाला सर्वांनाच बरं वाटलं. कारण तुम्ही असे मोकळे मिळणं जरा कठीणच.

तसं काही नाही. आज जरा सवड होती म्हणून येऊ शकलो.

काका, तुम्ही मघाशी जेवताना संस्कृतीबद्दल सांगत होतात– माधव.

हो, मघाशी मी तुला संस्काराबद्दल सांगताना सांगितलेलं आठवतं का?

हो, संस्कार. काय करतात वगैरे सर्व चांगलं लक्षात आहे माझ्या.

नाही. सं हा कृ या संस्कृत धातूला लागलेला एक उपसर्ग. कृ म्हणजे करणे. सं– म्हणजे भले, चांगली कृती म्हणजे क्रिया. मानवाच्या अंतिम भल्याकरता करावयाच्या ज्या अनेक गोष्टी आचरणात आणल्या जातात त्यांना संस्कृती असे म्हणतात. पूर्वीच्या ऋषींनी स्वतः अनुभव घेऊन मनुष्याचे जीवन समृद्ध आणि सुखी कसे होईल याचा एक आचारकोश तयार केला आणि सर्वांना त्यांनी त्याप्रमाणे वागण्याचा उपदेश केला.

पण काका, प्रत्येक माणसाचं सुख-दुःख आणि जीवन निराळं असतं.

पण पूर्वीच्या ऋषींनी अशी अनेकांची अनेक सुख-दुःखे एकत्र

करून त्यांचा विचार केला. त्यांतून कोणत्या आचाराने त्यांना सुख प्राप्त होईल याचा मार्ग शोधून काढला आणि तो त्या लोकांना सांगितला. ऋषी महान बुद्धिमान होते. त्यांना दूरदृष्टी होती. केव्हा काय करावे याचा त्यांनी मागोवा घेतला होता आणि त्याप्रमाणे चांगले काय ते त्यांनी जगाला सांगितले.

ऋषींना जे चांगले वाटले ते सर्वांनाच चांगलं वाटेल असं कसं म्हणता येईल– माधवची आई.

वहिनी आता उदाहरण द्यायचं झालं तर असं बघा, उद्या माधव जरा मोठा झाला, त्याला चार मित्र मिळाले की, त्याला वाटू लागेल आपण हॉटेलात जावं, चांगलं चमचमीत खावं, धूम्रपान करावं, सिनेमा बघावेत, अभ्यास करू नये. परीक्षेच्या वेळी नको त्या मार्गाचा अवलंब करावा आणि परीक्षा द्यावी. हे करताना त्याला वाटेल आपण करतो तेच भले आहे. त्यासाठी काहीही करायची, वेळेनुसार खोटे बोलणे किंवा व्यसने भागविण्यासाठी मित्रांकडून उसनें पैसे घेणे किंवा चोरी करणे त्याला प्रशस्त वाटेल. त्याला विचारलं, सुखाचा मार्ग कोणता तर आपण जो आचार करतो तोच खरा सुखाचा आणि फायद्याचा मार्ग आहे असं तो सांगेल. तुम्हाला आणि बाबासाहेबांना त्याचा हा आचार म्हणजे भल्याचा मार्ग आहे असंच वाटेल ना ?

नाही. हा मार्ग अगदी चुकीचा आणि आयुष्याचा घात करणारा आहे.

होय ना ? मग तुम्हाला काय वाटतं ?

आम्हाला वाटतं आमचा माधव मोठा व्हावा. त्यानं खूप खूप शिकावं, कोणत्याही व्यसनांच्या आहारी जावू नये. प्रकृती उत्तम ठेवावी. सर्वांनी त्याला चांगला म्हणावं आणि आम्हाला कमीपणा

एक संस्कार मानला आहे. परंतु त्यांच्याकडे तो करार आहे. पतिव्रता, सौभाग्यवती, सती असले शब्द तिकडे ऐकायलासुद्धा मिळणार नाहीत. कारण स्त्रीने आपल्या पतीकरता केलेल्या त्यागाच्या भूमिकेला ही नावे आहेत.

तिकडचे जीवन मग अगदीच अस्थिर असेल नाही– माधवची आई.

तुम्हाला एक उदाहरण सांगतो. आमच्या वसूच्या लग्नाला एक पाश्चात्य दांपत्य आलं होतं. त्यांनी वधुवरांचं अभिनंदन केलं. नंतर आम्ही एका ठिकाणी बसलो तेव्हा त्या दांपत्यापैकी पुरुषाने मला विचारले– हे आता कायमचे पतिपत्नी ना ? मला न समजल्याने मी असे आपण का विचारता म्हणून विचारले. तेव्हा ते गृहस्थ म्हणाले, आमच्याकडे बायको नवऱ्याला सोडून केव्हा निघून जाईल हे सांगता येत नाही. समजा ती बाजारात गेली असली– ती आली तर आपली. नाहीतर काय होईल ते सांगता येत नाही.

हे उदाहरण अगदी बोलके आहे. आपण आपल्याकडे सर्व संसाराचा भार सर्वजण उचलतो. त्यामुळे संसार सुखाचा होतो.

तुम्हाला सांगतो वहिनी, मला एके ठिकाणी आजच्यासारखाच जेवण्याचा प्रसंग आला. ज्यांच्याकडे गेलो होतो त्यांचं वास्तव्य बरेच दिवस परदेशात होतं. त्यामुळं या ठिकाणी आल्यावरसुद्धा सर्व परदेशी थाट. आम्ही टेबलाच्या भोवती बसलो. जेवणाचे सर्व पदार्थ मध्ये ठेवले होते. ज्याला जे लागेल ते त्याने मनाप्रमाणे घ्यायचे. मी चटणीची वाटी पुढे घेतली. एक चमचा मी माझ्या शेजारीच बसलेल्या गृहस्थांच्या पानात वाढली. मग मी घेतली. त्यावेळी ते गृहस्थ म्हणाले, आम्ही परदेशात बरेच वर्षे

राहिलो. तेथील संस्कृती आणि आपल्याकडील संस्कृती यांच्यामध्ये तसा फारसा फरक नाही. भारतात आपण पूर्वी पाटावर जेवायला बसत असू, आता टेबलावर बसतो. इतक्यात समोरचा पाण्याचा कुंडा उचलून मी त्यांच्या ग्लासात पाणी ओतले. मग माझा ग्लास भरून घेतला. त्यांनी पुऱ्या उचलल्या, प्रथम दोन-तीन पुऱ्या आपल्या पानात घेतल्या आणि मग माझ्या पानात वाढल्या. हे त्यांचे वाढप झाल्यावर मी त्यांना म्हटले, हा एवढा मोठा फरक आहे आपल्या आणि त्यांच्या संस्कृतीत. माझ्याकडे पाहात ते म्हणाले, माफ करा पण मला मात्र तुम्ही काय म्हणता ते समजले नाही.

आता तुम्हीच पहा, तुम्ही ह्या पुऱ्या वाढताना काय केलंत?

मी माझ्या पानात घेतल्या आणि मग तुमच्याही पानात वाढल्या.

पण मी मात्र तुमच्यासारखं केलं नाही. मी पाणी प्रथम तुमच्या ग्लासात घातले आणि नंतर माझ्या ग्लासात घेतले. चटणीचे पण तसेच केले.

मग त्यात फरक काय पडला ?

फरक फार मोठा आहे. संस्कृती माणसाच्या अंगात मुरली की आचारांतून तिचं स्वरूप प्रकट होतं. तुम्ही प्रथम आपले ताट पाहिलेत आणि मी माझ्या शेजाऱ्याचे पाहिले. कारण भारतीय संस्कृतीचा हा विशेष आहे की प्रथम दुसऱ्याला संतुष्ट करा आणि मग तुम्ही तुमचे पहा. ह्या गोष्टी सहज होतात. मुद्दाम कराव्या लागत नाहीत. या कृतीतून माणसांच्या हृदयाची रुंदी लक्षात येते. भारतीय संस्कृती माणसाचे हृदय सुपासारखे मोठे करण्यास शिकवते. मोठ्या हृदयाला स्वतःपेक्षा शेजारी प्रथम दिसतो.

हे मात्र खरे आहे, आपल्याकडे बायका आपल्याबरोबर जेवायला बसतील. जेवायला वाढताना प्रथम आलेला पाहुणा, मुलं, पती आणि नंतर स्वतः अशा क्रमानेच वाढील. असं करायला मिळालं नाही तर तिला बरं वाटत नाही.

हा भारतीय संस्कार आहे. पुरुष कितीही बदलले तरी बायका लवकर बदलत नाहीत. माझे हे वाक्य ऐकून वहिनी आणि बाबासाहेब मला म्हणाले–

काकासाहेब, आज आम्ही बरंच काही मिळविलं, पण आम्हाला असं विचारायचं आहे की, आपली संस्कृती म्हणजे देवार्चन, स्नान-संध्या वगैरे आम्ही समजत होतो. पण संस्कृती म्हणजे निराळंच काही आहे याची जाणीव मात्र आज झाली. मग काकासाहेब, स्नान-संध्या, देवार्चन वगैरे म्हणजे देखील भारतीय संस्कृतीच की नाही ?

भारतीय संस्कृतीचा तो एक भाग आहे. या सर्व क्रियांच्यामागे एक महान तत्त्व आहे. परंतु ते तत्त्व न सांगता, धार्मिक कृत्याच्या आवरणात ते बद्ध करून लोकांना त्याप्रमाणे आचार करायला सांगण्यात आले आहे. संध्या म्हणजे मनाची शक्ती वाढविण्याचा एक महत्त्वाचा आचार आहे. भारतीय संस्कृती म्हणून जे धार्मिक आचार आहेत त्यांच्यामागे आरोग्य आणि समाजाचा विकास याचा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक आचार आपण माहीत करून घेतला पाहिजे. आता तुम्ही बायका कुंकू लावता. कशासाठी ?

सौभाग्य चिन्ह म्हणून लावतात. पूर्वी पासून हाच उद्देश आहे.

नाहीः याचे खरे कारण निराळे आहे. पुरुषांना गंध आणि स्त्रियांना कुंकू लावण्यास सांगितले आहे. याचे खरे कारण डोळ्यात

उतरणारे रक्त शुद्ध आणि शांत असावं. पूर्वी जे कुंकू तयार करीत असत ते हळदीपासून तयार केलेल्या पिंजरेत हिंगुळ वगैरे औषधी गुण असलेले पदार्थ मिसळून. आत्ताचे कुंकू म्हणजे केवळ रंग आहे. कुंकू आणि सौभाग्य यांचा तसा फारसा निकटचा संबंध नाही.

पूजा करण्याच्या मागे देखील असाच हेतू असेल नाही– माधव.

होय. पूजा ही स्नान झाल्याबरोबर करावी असं सांगितलं आहे. पूजा फक्त धोतर किंवा सोवळे नेसून करतात. इतर कपडे अंगात घालत नाहीत.

होय. उघड्यानेच पूजा करतात. आमचे आजोबा उघड्याने पूजा करायला देवळात जातात.

तेच बरोबर आहे.

ते कसं ?

त्याचं असं आहे, आपण अंघोळ केली की आपले अंग ओलसर असते. अशा अंगाला सूर्य प्रकाशाचा स्पर्श झाला की, शरीरात जाणाऱ्या रोगजंतूंना प्रतिबंध होतो. सूर्याच्या तेजात बरेच चांगले गुण आहेत. ते शरीराला प्राप्त व्हावेत म्हणून स्नान झाल्याबरोबर थोडा वेळ उघडं राहावयास सांगितले आहे. त्यामुळे कातडीचे रोग कधीही होणार नाहीत.

पण नवीन बांधणीच्या घरात हे सर्व कसे जमेल– आई.

आपण दारं खिडक्यांना पडदे लावून सूर्यकिरणांना आत यायला मज्जाव करतो. सूर्यच नाही मग आरोग्य तरी कसं नांदावं. माधवचे आजोबा पूजा करायला देवळात जात होते. होय ना ?

होय. हातात पूजा साहित्य, पायात काही घालायचं नाही, असा कटाक्ष होत त्यांचा.

तेच बरोबर. देवळात जाऊन पूजा करावी हा झाला धार्मिक आचार. अनवाणी चालताना मातीवरून चालावं लागतं. मातीवरून रोज चालावं असं सांगितलं तर कोणी ऐकणार नाही. म्हणून देवळातील पूजेबरोबर त्या चालण्याची सांगड घातली.

मातीवरून चालण्यात विशेष काय असतं– आई.

मातीवरून अनवाणी चाललं की, शरीरात निर्माण होणारी आणि आवश्यक नसणारी विद्युत् पृथ्वीत जाते आणि आवश्यक तेवढीच विद्युत् शरीरात आपोआप राहाते. शरीरात विद्युत् जास्त झाली तर माणसाला आळस येतो.

हा केवढा फायदा आहे–

असे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक आचार आहेत. आपण या सर्व आचाराचे मूळ शोधून काढले पाहिजे. म्हणजे भारतीय संस्कृतीचे वैभव लक्षात येते. बोलता बोलता बराच वेळ झाला. उठतो. मी आता.

*

# सहा

नेहमीप्रमाणे माधव आला. नमस्कार करून खुर्चीवर बसत तो म्हणाला, काका, मागच्या रविवारी तुम्ही जेवायला आलात त्याचा आनंद तर सर्वांनाच झाला. पण त्याहीपेक्षा तुमच्याजवळ बोलताना तुम्ही ज्या अनेक गोष्टी सहजपणे सांगितल्यात त्याचाच आनंद आम्हाला अधिक झाला. आमच्या कित्येक चुका आणि गैर समजुती आम्हाला कळून आल्या. परवा आमच्या शाळेत एका गृहस्थांचे व्याख्यान झाले. हिमालय हा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. याबाबत सांगताना त्यांनी असं सांगितलं की, भारताचं तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृती ही हिमालय आणि हिमालयातून निर्माण होणारी गंगा यांच्याभोवती आहे. सर्व देवदेवता या हिमालयाच्या आश्रयाने राहतात आणि त्याच भारताचे रक्षण करतात. हे सांगताना त्यांनी पुष्कळ देवांची नावे घेतली. शेवटी त्यांनी सांगितलं की, आयुष्यात एकदा तरी त्या हिमालयाच्या परिसरात जाऊन या. मला त्याचे व्याख्यान आवडले. काका, मला प्रश्न पडला तो हा की, या सर्व देवता निर्माण कशा झाल्या.

एक चांगला प्रश्न विचारलास. तू ऐकलेले व्याख्यानही चांगले होते. त्या व्याख्यानात– बऱ्याच गोष्टी आल्या. त्यातल्या एकाच प्रश्नाचे स्मरण तुला झाले. कारण आजच्या युगात देव-धर्म वगैरे म्हणजे काही तरी थोतांड आहे अशी समजूत आहे. त्यामुळे देव कसे निर्माण झाले हे देखील आपल्याला माहीत पाहिजे. तुला आर्यांचा प्राचीन इतिहास आठवतो का ?

हो. आठवतो. आर्य लोक भारतात आले भारत हा देश त्यांना सर्व सुखसोयींनी नटलेला आणि सर्व प्रकारे चांगला वाटला. आणि त्यांनी या ठिकाणी वस्ती केली.

हे लोक राहू लागले तेव्हा त्यांना मदत करणारी एक एक गोष्ट त्यांना कळू लागली. जी गोष्ट मदत करते, आपल्या जीवनात आपल्याला सुख देते त्या त्या गोष्टीला त्यांनी देव मानायला सुरवात केली. थंडीच्या दिवसांत ऊन पाहिजे. ऊन कोण देतो.

ऊन तर सूर्यापासून मिळते.

उन्हामुळे थंडीत रक्षण होते. म्हणजे सूर्य उपकारक देवता आहे. म्हणून सूर्याला लोकांनी देव ठरविला आणि लोक त्याची पूजा करू लागले. तसेच शेतामध्ये धान्य पिकते. ते धान्य शिजविल्याशिवाय खाता येत नाही. धान्य शिजविण्याचं काम अग्नीचे. म्हणून अग्नीला देखील लोकांनी देव मानलं. इतकंच नव्हे तर भारतीय संस्कृतीत अग्नि आणि पाणी यांची कोणत्याही समारंभापूर्वी पूजा केली जाते. तुला वेद माहीत आहेत ?

हो. चार वेद आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद.

बरोबर. या वेदांचा जो प्रारंभ आहे तो अग्नीच्या मंत्रांनी आहे. इतकं अग्नीला महत्त्व आहे. पूर्वीच्या लोकांना जी वस्तू उपयुक्त वाटली, परंतु या वस्तूवर आपण सत्ता चालवू शकत नाही

अशा अनेक गोष्टींना देव मानण्यात आलं.

मनुष्याला मदत करणाऱ्या अशा अनेक गोष्टी आहेत. त्या सर्वांना मनुष्याने देवत्वाचा मान दिला आहे. मागे तुला मी सांगितल्याचे आठवते का ? आपल्याला देव वगैरे दिसत नाही. पण एक महान शक्ती आहे. ती दिसत नसली तरी ती मनुष्याच्या भल्यासाठी फार मोठी कामे करते. त्या शक्तीचे आभार मानले पाहिजेत. या शक्तीलाच देव अशी संज्ञा आहे. अशी शक्ती एकच पण तिची रूपे मात्र निरनिराळी. काम निराळं. ज्याला जे रूप आवडलं ते त्याने स्वीकारले आणि तोच देव मानून त्याचे आभार मानायच्या पद्धती निर्माण केल्या. काही लोक या देवाला नमस्कार करतील. काही साष्टांग नमस्कार घालतील, काही फुल वाहातील तर काही हार घालतील. असे अनेकविध उपचार करून त्या देवतेचं मोठेपण सतत मनात ठेवतात.

शक्तीच्या विविध रूपांना देव म्हणतात. त्या देवता दिसत नाहीत.

पण त्यांचे परिणाम तर जाणवतात ना ?

होय. त्यांचे परिणाम तर खूपच जाणवतात.

देवता आणि त्यांचे मानवी जीवनावर होणारे परिणाम हा एक स्वतंत्र विषय आहे. तो तुला आता कळणार देखील नाही. पण याशिवाय अन्य काही दृश्य देवता आहेत.

त्या कोणत्या ?

मगाशी मी तुला म्हटले ना ? त्याप्रमाणे सूर्य, चंद्र, अग्नि, वनस्पती, नद्या, सागर, पर्वत, पृथ्वी, आपले आई-वडील, आपले गुरु ह्या सर्व देवता तर आपल्याला दिसतात.

होय. ह्या देवता आहेत माहीत. ह्या 'प्रत्येकाचा आदर कसा

करावयाचा ते देखील एक शास्त्र आहे. आता आपल्याला सर्वांत जवळ असलेली देवता कोणती माहीत आहे ?

हो. पृथ्वी, आपले आई-वडील, गुरु.

बरोबर. पृथ्वीला धरती, धरा, क्षमा, अवनी अशी अनेक नावे आहेत. प्रत्येक नावात आगळेपण आहे. पृथ्वीला क्षमा म्हणतात ना ?

हो.

तसं का म्हणतात माहीत आहे ?

नाही.

त्याचं कारण ती सर्वांना क्षमा करते.

ती कशी काय ?

हे बघ, समज तू गर्दीतून चालला आहेस. आणि त्या गर्दीत शेजारून चाललेल्या माणसाचा बुटाचा पाय तुझ्या पायावर पडला तर काय होईल.

पायाचा अगदी चेंदामेंदा होईल.

आणि तसा तो झाल्यावर तू ते सर्व सहन करून गप्प बसशील ? होय की नाही.

नाही. त्या माणसाचा मला राग येईल.मी रागावेन त्याच्यावर.

होय ना ?

होय तर. पायावर पाय देताना दुसऱ्याच्या पायाचे काय होईल याची काळजी नको का ?

अगदी बरोबर बोललास. तू रात्री पलंगावर झोपतोस. सकाळी उठलास की, जमिनीवर पाय ठेवून चालू लागतोस.

कारण उठल्याबरोबर दात घासून तोंड धुवायचे असते. ते जर लवकर केले नाही तर आई आणि बाबा रागावतात. त्याला एकदा

उशीर झाला की मग सगळ्यालाच उशीर होतो.

पण कायरे, उठल्याबरोबर तू पृथ्वीवर पाय ठेवतोस. त्यावेळी तुझ्या मनात कधी विचार आला का की आपण पृथ्वीवर पाय ठेवतो. त्याने पृथ्वीला किती त्रास होत असेल. तुझ्या पायावर दुसऱ्याचा पाय पडला तर तुला राग येतो. मग तुझा पाय पृथ्वीवर पडला तर ती मात्र कधी रागवत नाही. ती म्हणते, माझंच बाळ आहे. आपण सर्वच पृथ्वीची बाळं आहोत. ती आपल्या बाळावर कधी रागवत नाही. नेहमी क्षमा करते.

मग अशा वेळी आपण काय करावं ?

आपण पृथ्वीवर पाय ठेवण्यापूर्वी पृथ्वीची क्षमा मागावी. तोंडाने म्हणावे. पादस्पर्शं क्षमस्व मे । तिचं कर्तव्य ती करते मग आपलं कर्तव्य आपण नको करायला ?

आपण आपल्या कर्तव्यात कधीही चुकू नये. तुम्ही मला कितीतरी वेळा हे सांगितलं आहे. पण काका असं काही असतं याची जाणीवच नाही आम्हा मुलांना.

तसंच आई-वडिलांचं. आईसारखं दैवत नाही. न मातुः परदैवतम् । असं मोठ्या, अनुभवी आणि विचारवान लोकांचं म्हणणं आहे. ज्ञानेश्वर महाराज किती मोठे होते तुला माहीत आहे. तुला मी या बाबतीत एक त्यांची उक्ती सांगतो. पाठ करून सतत आचरणात आणण्यासारखी आहे.

काका, मी वही बरोबर आणली आहे. आता तुम्ही जे सांगितलंत ना ते मी यात लिहून घेतलं आहे.

काय काय लिहिलं आहेस ?

तुम्ही पाठ करा म्हणून जे सांगितलंत तेच. म्हणजे पृथ्वीसाठी पादस्पर्शं क्षमस्व मे । आईसाठी न मातुः परदैवतम् ।

तशीच ही ओवीपण लिहून ठेव.

सांगा.

सकल तीर्थांचिये धुरे । जिये कां मातापितरें ।
तयांचे सेवे किर शरीरे । लोण कीजे ।

नीट लिही.

ओवी लिहून घेतली. पण तिचा अर्थ नाही समजला.

अर्थ सांगतो.

सर्व तीर्थक्षेत्रांमध्ये सर्वश्रेष्ठ असे जे तीर्थ आई-वडील, त्यांची सेवा करताना आपला हा देहदेखील त्यांच्यावरून ओवाळून टाकावा. म्हणजे आपल्या देहाचीसुद्धा पर्वा करू नये.

फारच चांगला संदेश दिलाय ज्ञानदेवांनी.

त्यांना का मोठं मानतात, त्यांची सेवा का करावी ? तू जरा विचार कर. तू जन्मल्याबरोबर काही मोठा झाला नाहीस. तुझी सर्व सेवा आईनं केली. तुला दूध पाजलं, तुला काही आजार झाला तर रात्र-रात्र ती तुझ्यासाठी जागली. तुझं शी-शू कशाची तिनं घाण मानली नाही. म्हणून तर तू मोठा झालास. बाबांनी देखील तेच केलं होय ना ?

होय काका– डोळ्याला आलेलं पाणी पुसत माधव म्हणाला. तुम्ही सांगता याचा आम्ही मुलं कधी विचारच करीत नाही. प्रत्येक मुलाने याची जाणीव ठेवली पाहिजे.

नुस्ती जाणीव नाही. हे आपल्या घरातले अगदी चालते बोलते देव आहेत. लहानपणी त्यांनी आपली सेवा केली. आपण कितीही मोठे झालो तरी आई-वडिलांपेक्षा नाही. त्यांची आज्ञा मानणं हे आपलं परम कर्तव्य आहे. तुला एक गोष्ट सांगतो. जो जो मनुष्य तुला मोठा दिसतो तो केवळ आईच्या सेवेमुळं. आईच्या आशीर्वादा-

मुळं. तू सी. डी. देशमुखांचं नाव कधी ऐकलं आहेस ?

नाही. कोण होते ते ?

पहिल्या इयत्तेपासून आय. सी. एस. पर्यंत त्यांचा नेहमी पहिला क्रमांक असे. ते आय. सी. एस्. झाल्यावर पुढे रिझर्व बँकेचे गव्हर्नर झाले. त्यावेळी नोटांवर त्यांची सही असे. इतका मोठा माणूस. त्यांचं गाव रोहा. एकदा ते आईला भेटण्यासाठी घरी आले होते. जायचा दिवस उजाडला. ते सकाळी निघणार. त्यांनी आईला नमस्कार केला. तेव्हा ती म्हणाली– चिंतामणी मला वाटतं आज तू राहा आणि उद्या सकाळी जा.

ठीक आहे. तू म्हणशील तसं. नाही मी जात मुंबईला. त्यांना अतिशय महत्त्वाची कामं होती. त्यांनी मुंबईला तार केली. घरी राहिले. दुपारी जेवताना आई म्हणाली– अरे, मी कशी खुळी बघ. तुला कामं असतात. तू आता मोठा झालास. मी विसरलेच. मला वाटतं माझा चिंतामणी अजून लहानच आहे.

खरंच आहे ते आई. तुझा चिंतामणी अजून लहानच आहे. तुझ्या आज्ञेपुढं मला अन्य सर्व तुच्छ आहे.

त्या दिवशी ते गेले नाहीत. मुंबईच्या किनाऱ्यावर सकाळीच वादळ झालं होतं. रस्त्यात झाडं पडली होती. त्यामुळं रस्ताही बंद होता. दुसऱ्या दिवशी ते निघाले. ते म्हणाले–

आईची आज्ञा मोडली असती आणि निघालो असतो तर ना घरी ना दारी अशी स्थिती झाली असती. आईची आज्ञा देवापेक्षा-सुद्धा मोठी. ते नेहमी सांगत, मी मोठा झालो. माझा गौरव सर्व लोक करतील. पण त्या गौरवापेक्षा आईनं 'अरे चिंतामणी' म्हणून हाकारलं म्हणजे समाधान आणि आनंद वाटतो तो मला

कोणी कितीही मोठे म्हटले तरी वाटणार नाही. जगात मला सर्व अहो म्हणतील पण अरे म्हणणारी फक्त आई आणि आईच आहे.

माधव गंभीर होऊन म्हणाला– माझी आई खरोखरीच किती मोठी आहे ते आज मला कळलं.

माधव, जगात प्रत्येकजण मोठं होण्यासाठी धडपडतो. मोठे झाल्यावरसुद्धां लहान होता येणं हे मोठेपणाचं वैभव आहे. मुंगी किती लहान आहे. तिला साखर खायला मिळते. हत्ती केवढा मोठा, पण त्याला मात्र अंकुशाचा मार खावा लागतो.

लहान व्हायचं म्हणजे कसं ते नाही समजलं.

फार चांगला प्रश्न विचारलास. माणसाला विद्या, पैसा, कीर्ती, सत्ता असं काही मिळालं म्हणजे मनुष्याला गर्व चढतो. त्याला वाटतं आपल्यासारखा मोठा कोणी नाही. सगळे कसे माझ्या आज्ञेत आहेत. मला मोठा मानतात. कारण मी मोठाच आहे. मी वाटेल ते करू शकतो. मला कोण अडवणार! अशा गर्विष्ठ माणसाचे काही दिवस चांगले जातात. पण एकदा का त्याला उतरती कळा लागली की पुढे त्याचे नावसुद्धा कोणी घेत नाही. गर्वाचे घर खाली म्हणतात ते उगीच नाही.

रावण केवढा होता. उन्मत्त झाला. देवांनासुद्धा त्याने बंदीत टाकले. पण रामाने त्याचा गर्व हरण केला. तो कायमचा नाहीसा झाला.

कंससुद्धा असाच गर्विष्ठ आणि लोकांना त्रास देणारा होता. पण श्रीकृष्णाने मात्र त्याचा कायमचा नाश केला.

आणि याच्या अगदी उलट मारुती किती मोठा होता. किती

पराक्रमी होता.

काका, मी नमस्कार घालण्यापूर्वी एक मारुतीचा श्लोक म्हणतो. बाबांनी शिकविला मला.

कोणता श्लोक ?

मनोजवं मारुत्‌तुल्यवेगम्
जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्

अगदी यथार्थ वर्णन आहे त्याचं. परंतु रामचंद्राच्या पुढे तो नेहमी नम्र असे: रामचंद्रांपेक्षा आपण अगदीच लहान आहोत असं त्याला वाटे. त्यामुळे रामचंद्रांनी त्याला जवळ केला. इतकेच नव्हे तर त्याला अमरत्वाचा आशीर्वाद दिला. मारुती अमर आहे. म्हणून मी म्हणतो माणसाने कितीही मोठे झाले तरी नेहमी नम्र असावे. नम्र झालो म्हणजे आपोआपच इतर सर्व मोठे होतील.

आणि आपण नेहमी लहान होऊ– असंच की नाही.

बरोबर मला काय म्हणायचं ते तुझ्या चांगलं लक्षात आलं.

मग आपण नेहमीच लहान राहू.

असं मुळीच नाही. आपण ज्याप्रमाणे इच्छा करावी त्याप्रमाणे आपणास होता येते. तुला एक उदाहरण सांगतो. स्वामी रामतीर्थ पूर्वी गणिताचे प्राध्यापक होते. एकदा ते वर्गात आले. त्यांनी खडू घेतला आणि एक रेघ फळ्यावर काढली. नंतर वर्गाला उद्देशून ते म्हणाले, ही रेषा पाहिलीत. ती रेषा न पुसता लहान करून दाखवा. विद्यार्थी विचार करू लागले पण कोणालाच उत्तर सापडेना. शेवटी स्वामी उठले आणि त्या रेषेच्या खाली तिच्या-पेक्षा आणखी मोठी अशी एक रेषा काढली. नंतर ते वर्गाला म्हणाले, सांगा मला आता ही पहिली रेषा लहान झाली की

नाही ? वर्गाला आनंद वाटला. या क्रियेवर स्वामींनी वर्गाला सांगितले, आपण नेहमी दुसऱ्याला मोठे करण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे आपणाकडे लहानपण येते. पण खरं सांगायचं म्हणजे आपण लहान होऊन ज्यावेळी आपणाकडे लहानपण घेतो, तेव्हा आपण खऱ्या अर्थाने मोठे होवून गौरवास पात्र होतो. तुम्ही ज्याला मोठे केलेत तो तुमच्याबद्दल सांगताना तुम्ही मोठे आहात म्हणूनच दुसऱ्याजवळ तुमची स्तुती करील. आपण स्वत:ला मोठे म्हणण्यापेक्षा दुसऱ्यांनी मोठे म्हणण्यात आपले खरे मोठेपण आहे.

तुम्ही म्हणता त्याचा खरा अर्थ मला आता कळला. काका मघाशी आईबद्दल तुम्ही काहीतरी सांगत होता.

हो. मला म्हणायचं होतं, आई-वडिलांची सेवा ही सर्वात मोठी तपस्या आहे. तुला पुंडलीकाचे उदाहरण माहीत आहे ?

नाही.

पुंडलीक तुझ्यासारखाच मुलगा होता. आई-वडिलांच्याबाबत त्याला मुळीच आदर वाटत नव्हता. तो गर्विष्ठ झाला. पुढे एका साधूने त्याला सांगितले, तू आई-वडिलांची सेवा करीत नाहीस. उलट त्यांचा अनादर करतोस. तू माझ्याकडे येवू नकोस. घरी जा. आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांची सेवा कर. आई-वडिलांचा आशीर्वाद घे. मग मी तुला सुखाचा मार्ग दाखवीन. या बोलण्याने पुंडलीकाला आपलीच लाज वाटली. तो तडक घरी आला आणि आई-बापांची आज्ञा मानून त्यांची सेवा करू लागला. असेच बरेच दिवस गेले. एके दिवशी तो आपल्या आई-वडिलांचे पाय चेपीत बसला होता. त्याची परीक्षा पाहण्यासाठी पांडुरंग त्याच्या झोपडीत गेले.

देव त्याच्या झोपडीत गेले ?

हो, देव त्याच्या झोपडीत गेले. त्याला हाक मारली. त्याला बोलावू लागले, पण पुंडलीकाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. आपण ज्या विटेवर बसला होता, ती वीट त्याने देवाकडे भिरकावली आणि म्हणाला, देवा, मी आई-बापांची सेवा करीत आहे. तुमच्याकडे यायला मला वेळ नाही. सेवा संपली म्हणजे येतो. तोपर्यंत या विटेवर उभे रहा. पांडुरंग त्या विटेवर उभे राहून पुंडलिकाची वाट पाहू लागले. थोडचा वेळात सेवा संपली. तेव्हा तो पांडुरंगाकडे आला. नमस्कार करण्यासाठी तो खाली वाकला तोच पांडुरंगाने हाताला धरून त्याला उठविले आणि आलिंगन देत म्हणाला, पुंडलिका, तुझी भक्ती फार थोर आहे. तुझ्या सेवेने मी संतुष्ट झालो आहे.

पण देवा, मी तुमची सेवा मुळीच केली नाही. मी माझ्या म्हाताऱ्या आई-बापांची सेवा केली– तू माझ्यावर संतुष्ट व्हावेस असे मी काय केले आहे.

पुंडलिका, तू तुझ्या आई-बापांची सेवा केलीस ती माझी सेवा करण्यापेक्षासुद्धा महान आहे. म्हणून मी तुझ्यावर संतुष्ट झालो. मी तुला एक वर देतो.

पांडुरंगाने त्याला वर काय दिला ?

पांडुरंग म्हणाला, माझे भक्त तुझे नाव अगोदर घेवून मला हाक मारतील तेव्हाच मी त्यांच्या हाकेला ओऽ देईन. त्यांची दुःखे निवारण करीन. माझे दर्शन घेण्याच्या अगोदर तुझे दर्शन घेतील. त्यांनाच मी दर्शन देईन.

तेव्हा पुंडलीक म्हणाला, देवा, आपण मला एवढा मोठा करू

नका. मी तुमच्या पायाशीच राहीन. तेथेच मला सुख वाटेल.

तू माझ्या पायाशी राहिलास तरी लोक तुझेच दर्शन प्रथम घेतील आणि तुझ्याच नावाचा जयघोष केल्यावर माझे नाव घेतील.

लोक मग असंच करतात ? मी कधी ऐकलं नाही.

तू ऐकलंस, पण तुझ्या लक्षात येत नाही. लोक म्हणतात– ‘पुंडलीक वरदा हरिविठ्ठल’ हे तू ऐकलं नाहीस. विटेवर उभा राहिल्यामुळे पांडुरंगाला विठ्ठल म्हणतात.

आता आलं माझ्या लक्षात.

तुला जगात मोठं व्हायचं असलं तर आपल्या आई-वडिलांची मनापासून तुला सेवा करणं आवश्यक आहे.

काका, आज मला खूप बरं वाटलं. आई-वडिलांची सेवा आणि तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी चिकाटीनें अभ्यास करीन.

वा ! छान.

काका, नमस्कार करतो. तुमचे आशीर्वाद असले म्हणजे माझ्याकडून सर्वकाही यथास्थित होईल.

तथास्तु ! आपण दोघांनी तू आणि तुझे सर्व मित्र या सर्वांसाठी एक प्रार्थना म्हणूया. मी सांगतो तू म्हण.

ॐ सं गच्छध्वम् ।
सं वदध्वम् ।
सं वो मनांसि जानताम् ।।
देवाभागं यथापूर्वे ।
संजानाना उपासते ।।
समानी व आकूतिः ।
समाना हृदयानि वः ।

समानमस्तु वो मनो ।
यथा वः सुसहासति ॥ (ऋग्वेदः १०-१९१.)

---

टीप– प्रार्थनेचा अर्थ–हे परमेश्वरा, आम्ही सर्व एक विचाराने चालणारे, एकच तत्त्व बोलणारे, सारख्या मनाचे, देवाप्रमाणे समान, बुद्धिवंत होवून, बरोबरच मोठे होवो. आमची प्रार्थना एक असू दे, आमची हृदये एकमेकाशी मिळोत, आमची मनें आणि विचार एकच असोत आणि आम्ही सर्व प्रकारे संघटित होवो.

*

BVBK-0401979

म. ग्रं. ठाणे, ग्रंथालय
वा. क्र.
विषय क्र.